
# ‘स्व’ रूपवर्धिनी

कार्यवृत्त १९९२-९३

## विकसित व्हावे । अर्पित होऊन जावे...

परिसरातल्या अणुरेणूतुन
अविरत वेचूनि तेजाचे कण
रसगंधांशी समरस होऊन
हृदय कमल फुलवावे
विकसित व्हावे ।
अर्पित होऊन जावे.



# ‘स्व’-रूपवर्धिनी ......

## कार्यवृत्त १९९२-९३

अंतरंगात .....


- संवाद ३
- माणूस घडवायला हवा
  — श्री. अण्णासाहेब हजारे ४
- मुंगी उडाली आकाशी
  — श्रीमती पुष्पाताई नडे ८
- चाकोरीबाहेरचे शिक्षण
  — श्री. अजय कदम १२
- या बंधू सहाय्याला हो !
  (भूकंप मदतकार्यातील अनुभव) १७
- हे वीर विवेकानंद २१
- वर्धिनीची साथसंगत, गुणांची शिदोरी २४
- शाखावृत्त २७
- प्रकल्पवृत्त ३५
- पुढच्या कामाची दिशा
  — श्री. दि. दा. जोशी ४१



संपादक : श्री. संजय तांबट

मुखपृष्ठ : श्री. रवींद्र देव
ग्राफी ॲडव्हर्टायझिंग

मुद्रण : प्रबोध उद्योग
शुक्रवार पेठ, पुणे


साधकोंका संगठन, राष्ट्रसेवामें हो समर्पण ।

## प्रार्थना

नमस्कार देवा तुला आमुचा हा
करी आमुची मायभूमी महा ॥

हिचे रूप चैतन्यशाली दिसावे
जगाला कळावी हिची थोरवी ।
स्मरूनी हिच्या त्या कथा अन् व्यथाही
हिला न्यायचे रे पुन्हा वैभवी ।
अशा सर्व स्वप्नांस सामर्थ्य द्यावे
म्हणूनीच देवा नमस्कार हा ॥१॥

जनांचा प्रवाहो इथे चाललेला
सदा संस्कृतीच्या मुळापासुनी
पिढ्या नांदती भोवती बांधवांच्या
आम्ही भिन्न ना त्यांचियापासुनी
तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला
तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा ॥२॥

स्फुरो कल्पनाशक्ति अभ्यास-यत्ने
बनो शुद्ध बुद्धीही तेजस्विनी
शरीरास आरोग्य, संकल्प चित्ती
नि आत्म्यास इच्छा शुभाकांक्षिणी ।
पदी धैर्य, बाहूत शौर्य स्फुरावे,
घडावी विवेकी कृती - ध्यास हा ॥३॥

प्रभो तू चिदानंदरूपी असोनी
अणू रेणू ब्रह्मांड तू व्यापिले ।
तुझे अंश आम्ही तुझ्या पूजनाचे
पहा दिव्य हे ध्येय स्वीकारले ।
पुन्हा जन्म घेऊ, स्वराष्ट्रास ध्याऊ
प्रतिज्ञेस या तूचि साक्षी रहा ॥४॥

* * *

## 'स्व'-रूपवर्धिनी

**म्हणजेच . . . . . . . .**

- सहवासातून शिक्षण व शिक्षणातून संस्कार घडविणारी संस्था
- व्रती शिक्षक आणि तळमळीचे कार्यकर्ते यांच्या द्वारा हेतुप्रधान शिक्षण देणारी एक चळवळ
- आपुलकीने व जिव्हाळ्याने मुलांचे प्रश्न हाताळणारा, सर्वांना आपला वाटणारा परिवार.
- विपरीत परिस्थितीवर मात करायला शिकवणारी कार्यशाळा.
- राष्ट्रीय चारित्र्य, सार्वजनिक शिस्त आणि सामाजिक बांधिलकी जोपासणारा एक संभाव्य 'राष्ट्रीय प्रकल्प'
- परिस्थितीचा शाप आणि वातावरणाचा ताप असला तरीही सदैव प्रगतीचाच मार्ग दाखविणारी आपुलकी निर्माण करणारी संघटना
- अर्थात, ही पूर्ण वेळेची शाळा नाही, शाळेला पर्यायही नाही. विविध उपक्रमांद्वारे एकही दिवस सुट्टी न घेता वर्षभर सायंकाळी राबविला जाणारा हा एक शिक्षण प्रकल्प.

• •

**बहुनामेमि प्रथमो बहुनामेमि मध्यमः ।**
**किं स्विद्यमस्य कर्तव्यं यन्मयाऽद्य करिष्यति ॥**


मी कितीकांहून श्रेष्ठ आहे. काही थोडे माझ्यापेक्षा श्रेष्ठ आहेत हे खरे, पण मी अगदीच काही शेवटचा नाही. मी खात्रीने काही करू शकतो.

(कठोपनिषद)

## सं वा द



'**स्व**'-रूपवर्धिनीच्या वास्तूच्या नवीन दोन मजल्यांचे उद्‌घाटन मा. श्री. अण्णासाहेब हजारे यांच्या हस्ते यावर्षी झालं. कामाच्या वाढीचा एक अपरिहार्य भाग म्हणून हे नवं बांधकाम आवश्यक होतं. वास्तूची उंची तर वाढली परंतु खरं आव्हानाचं काम यापुढेच आहे. वास्तूची उंचीही खुजी ठरावी, अशा उत्तुंग कर्तृत्वाची माणसं इथं घडावीत हे स्वप्न आहे. अर्थात कोणत्याही क्षेत्रात आपलं मानाचं स्थान निर्माण करणारी माणसं एका रात्रीत घडत नाहीत. हे घडणं निरंतर असतं. त्यासाठी सातत्याने जागरुक राहून अथक परिश्रम करण्याची नितांत आवश्यकता आहे. शिवाय ही माणसं समाजामध्ये सहजपणे मिसळणारी, प्रसंगी संघर्षशील पण विनम्र वृत्तीची असावीत हे 'स्व'-रूपवर्धिनीचे स्वप्न आहे. कदाचित हे स्वप्न फार मोठं वाटेल, पण किमान स्वप्नं पाहाण्यात तरी भव्यपणा असावा. या स्वप्नपूर्तीच्या दिशेने गेल्या वर्षभरात झालेला थोडा प्रवास या कार्यवृत्तात मांडण्याचा प्रयत्न आहे. कळीचं फुलात रुपांतर होणं, जसं शब्दांत मांडणं अवघड आहे, तसंच हे काम आहे. घडलेले प्रसंग, कार्यक्रम आहेत तसे पोहोचविण्याचा हा प्रयत्न आहे. यातून अशा कामांची अनुभूती स्वत: घ्यावी, असं सुहृदांना वाटलं तर हा प्रयत्न सफल झाल्याचं खरंखुरं समाधान मिळेल.



# माणूस घडवायला हवा

– पद्मभूषण श्री. अण्णासाहेब हजारे

**'स्व'-रूपवर्धिनीच्या युवकांचे शिबिर व वार्षिक नियोजन बैठक यंदा राळेगण सिद्धी येथे झाली. येथील प्रेरणा जागविणाऱ्या वातावरणात आपल्या कामाचा झालेला सर्वांगीण विचार निश्चितच फलदायी होणार आहे. या शिबिराच्या समारोप प्रसंगी मा. अण्णासाहेब हजारे यांनी केलेले मार्गदर्शन समाजासाठी काम करणाऱ्या सर्वांनी चिंतन करावं असे आहे. या शब्दांमागची तपश्चर्या अधिक महत्त्वाची आहे.**

थोरांचं बलशाली भारताचं स्वप्न आपल्या डोळ्यांसमोर आहे. विवेकानंद, गांधीजी यांनी सांगितलं की, खेड्यांच्या विकासाशिवाय राष्ट्राचा विकास अशक्य आहे. खेडी स्वावलंबी, स्वयंशासित, स्वयंपूर्ण झाली तरच राष्ट्राचं नवनिर्माण शक्य आहे. उद्योगांशिवाय, मोठ्या कारखान्यांशिवाय देश पुढं जाणं शक्य नाही, असं काहींचं मत आहे. त्यामुळे त्यांच्या उभारणीमुळे खेड्यातील लोक शहराकडे आकर्षित झाले. शहरातील दळणवळण, वाहने वगैरे वाढली त्यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळला. त्यात डिझेल, रॉकेल, कोळसा यांचा प्रचंड उपसा झाल्याने खनिजसंपत्ती संपत आली. ही संपेल तेव्हा पुढच्या पिढीचे काय होणार? असा भयंकर प्रश्न उभा आहे.

**'माणूस' हा केंद्रबिंदू**

राळेगणमधील गेल्या १५/१६ वर्षातलं काम बाहेरून काही न वापरता फक्त निसर्गाने दिलेल्या साधनांचाच जास्त उपयोग करून झालं आहे. त्यामुळे सर्व प्रश्न सुटले आहेत. आपल्या राष्ट्रपुरुषांना या प्रकारची खेडी अपेक्षित होती. ज्यायोगे आपली खनिजसंपत्ती अबाधित राहील.

नुसत्या उंच उंच इमारती बांधणे म्हणजे विकास असा अर्थ या राष्ट्र पुरुषांना अपेक्षित नव्हता.



बलशाली भारत उभारण्यासाठी प्रथम खेड्यात 'माणूस' हा केंद्रबिंदू मानला पाहिजे. जोवर माणूस उभा राहात नाही, तोवर खऱ्या अर्थाने बलशाली भारत कधी उभा होणार नाही. माणसंही अशी की, ज्यांना सामाजिक बांधिलकीची जाण आहे, आपण आपलं जीवन जगत असताना आपले शेजारी, आपलं गाव, आपला देश, समाज यांच्यासंबंधी आपलं काही कर्तव्य आहे, ही जाणीव जोपर्यंत माणसात येत नाही, तोपर्यंत खरा विकास होणार नाही.

आपल्यासमोर लहानसा देश आहे. कोरिया की जो सर्व जगाला सांगतो की विकास कसा करायचा ते आमच्याकडून शिका! सात इंच पाऊस

पडणारा इस्रायल आम्हाला सांगतो की, सात इंच पावसात आम्ही काय काय करतो ते पहा! उद्ध्वस्त झालेला जपान राखेच्या ढिगातून उभा राहून सांगतो की विकास कसा करायचा ते आमच्याकडे पहा! आणि आपण सोनं गहाण टाकतो! असं का घडतं? तर माणसातील सामाजिक बांधिलकीची जाण कमी होत चालली आहे. मी आणि माझं यापलीकडे त्याची दृष्टीच जात नाही. म्हणून ही अवस्था. . .

**सामाजिक जाणीव महत्त्वाची**

'स्व'-रूपवर्धिनीच्या माध्यमातून आपण लोकांना सामाजिक बांधिलकीची जाणीव करून देतो. राळेगणमध्ये काम चाललं आहे ते याचसाठी. नुसत्या उंच इमारती उभारून काहीच होणार नाही. तर इमारतीच्या उंचीबरोबरच माणसांची वैचारिक पातळी वाढत जाणं, हाच खरा विकास आहे. पण सध्याची स्थिती अशी आहे की, इमारतींची उंची वाढते आहे. पण माणसांची वैचारिक पातळी खाली येते आहे. जे आपण पाहतो तो खरा विकास नाही, तर जे आपण पाहात नाही किंवा जे दिसलं नाही; पण फार महत्त्वाचं आहे; ते म्हणजे माणूस आणि त्यातील सामाजिक बांधिलकीची जाणीव. ती काय आहे तर, ज्या मंदिराची लाकडं लोकांनी दारूच्या भट्टयांसाठी जाळली; त्याच मंदिरात आज सात-आठ तोळे सोनं उघडं आहे; त्याला कडी-कुलुप नाही! हा विकास जास्त महत्त्वाचा आहे. हरिजन बांधवांवर सात-आठ हजार रुपयांचं बँकेचं झालेलं कर्ज गावकऱ्यांनी दोन वर्षे श्रमदान करून, पिकं काढून फेडलं. सामूहिक लग्नपद्धती! लग्न लावायला, वाढायला, स्वयंपाकाला सर्व जातीची माणसं कोठेही कसलाही भेदभाव नाही.

'स्व'-रूपवर्धिनीच्या माध्यमातून इथे येण्याचा उद्देश हाच की यातून तुमची सामाजिक बांधिलकीची जाणीव दृढ व्हावी, एक दृढनिश्चय व्हावा. याच दृष्टीकोनातून तुम्ही इथे आलात.

स्वामी विवेकानंदांनी म्हटलेच आहे की, ज्या शिक्षणातून सामाजिक बांधिलकीची जाणीव असलेला माणूस निर्माण होणार नाही, ते शिक्षण काय कामाचं! आम्ही स्वातंत्र्योत्तर काळात काय थोडी माणसं उभी केली! इंजिनिअर्स, डॉक्टर्स, वैज्ञानिक तयार केले पण वर्तमानपत्रात काय

**सेवेची संधी द्या !**

'स्व' रूपवर्धिनीचे काम हे संपूर्ण समाजाचे काम आहे. या कामाच्या उभारणीत अनेक मदतीचे हात उभे राहिले आहेत. श्री. बाबा कुदळे व श्री. अजित गिरमे यांचे सहकार्य तर कार्यकर्त्यांचाही उत्साह वाढविणारे आहे. त्यांचा स्वत:चा वाहतूक व्यवसाय आहे. गणेशोत्सवाच्या एका मिरवणुकीसाठी बालवाडीतल्या मुलांसाठी वाहनाची गरज होती. तेव्हा त्यांचा सहजपणे प्रथम परिचय झाला. वर्धिनीच्या मुलांची शिस्तबद्ध पथके त्यांनी पाहिली व ते कायमचे आपलेच झाले. यानंतर 'स्व' रूपवर्धिनीची राळेगणसिद्धी, आळंदी, पुण्यात अशी नऊ-दहा शिबिरे झाली. या शिबिरांसाठीची वाहतूक व्यवस्था संपूर्णपणे या दोघांनी सांभाळली. एक पैसासुद्धा त्यांनी त्यासाठी घेतला नाही. पैसे द्यायला गेलो तर त्यांचे उत्तर ठरलेले 'आम्हाला परके का समजता? आम्ही तुमच्यातीलच आहोत. वर्धिनी एवढं चांगलं काम करते. आम्हालाही सेवेची संधी द्या!' श्री. कुदळे यांची ही लाखमोलाची भावना पुढे एकशब्ददेखील बोलू देत नाही. आज ते वर्धिनीच्या मोठ्या कुटुंबाचे एक सदस्य झाले आहेत. वर्धिनीच्या कुठल्याही कार्यक्रमासाठी त्यांचा मदतीचा हात सदैव पुढे असतो. ●●


वाचतो आपण! पुलाचं उद्‌घाटन करण्याआधीच पूल ढासळला. टाकी उद्‌घाटनाआधीच ढासळली. तो शिक्षणातून अभियंता झाला पण खडी, सिमेंट खाण्यात जीवन घालविल्यावर तो अभियंता होऊन काय उपयोग! ज्या समाजाने दिलेल्या पैशावर मी अभियंता झालो, त्या समाजाचं तेवढं ऋण माझ्यावर आहे ही जाणीव तो विसरला.

**राळेगणचा अनुभव**

राळेगणमध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव लोकांमध्ये झाल्यानेच हे शक्य झालं. पण हे रामराज्य नाही. कारण इथंही भांडणं होतात, वाद होतात पण मारामाऱ्या होत नाहीत, रक्त सांडत नाही, कोर्टकचेरी नाही हा फरक आहे. तेव्हा इथे विशेष काही घडलेलं नाही. फक्त लोकांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण झाली. म्हणून इथे बाहेरच्या कोणाचा पैसा न घेता गावकऱ्यांनी ३५-४० लाख रुपयांच्या इमारती श्रमदानाने उभ्या केल्या. त्यांच्यातला माणूस जागा झाला. वास्तविक त्यांना माहीत आहे की या इमारतीत राहायला येणारे विद्यार्थी राळेगणचे नाहीत. तरीही प्रत्येक घरातील माणसाने यासाठी श्रमदान केलेले आहे. येथे येणारे विद्यार्थी नापास झालेले असतात. गुण पाहून त्यांना घेतलं जात नाही. ज्यांचं अभ्यासाकडे लक्ष नाही अशांना इथे घडवलं जातं म्हणून दहावीचा निकाल ९६% लागतो.

**राष्ट्र हे एक मंदिर**

सामाजिक जाणीव कमी होण्याचं कारण म्हणजे जीवनात अज्ञान निर्माण होतं. अज्ञान म्हणजे खाऊनपिऊन घ्या, चैन-मजा करून घ्या. तेव्हा खाऊनपिऊन निघून जाणं म्हणजे जीवन नव्हे याची जाणीव माणसांना होणं आवश्यक आहे. जर खाऊनपिऊन मरून जा, एवढाच अर्थ लावला तर



पशूत व माणसात फरक काय? पण ईश्वराने माणसाला बुद्धी दिली आहे. मी कोण? कुठून आलो? माझं कर्तव्य काय? याविषयी विचार करण्याची शक्ती फक्त माणसात आहे. मी कोण? हे शोधून काढण्यासाठी आपलं शास्त्र सांगतं की प्रत्येक प्राणीमात्रात एक चेतनाशक्ती आहे - आत्मा. त्या आत्म्याचं सार्थक करण्यासाठीच मनुष्यजन्म मिळाला आहे. ते सार्थक करणं म्हणजे ईश्वरसेवा करणं. या सेवेत चार भिंतींमध्ये एक मूर्ती आहे, असा दृष्टीकोन जेव्हा आपण ठेवतो, तेव्हा आपलं राष्ट्र, आपलं गाव हे एक मंदिर आहे आणि त्यातील जनता मूर्ती आहे. आणि तिची सेवा ही ईश्वरसेवा आहे. हा संदेशच सर्व संतांनी आम्हास दिला. ते म्हणतात की, समाजसेवा हीच खरी ईश्वरसेवा आहे. विवेकानंदांनी म्हटले आहे, 'तुम्हाला ईश्वर शोधायचा असेल तर तो दरिद्रीनारायणाच्या रूपात प्रगटलाय, तो तुम्हाला तिथे सापडेल.'

**आत्महत्येचा विचार बदलला**

माणूस का जगतो? असा प्रश्न मलाही भर तारुण्यात, वयाच्या पंचविशीत पडला. येताना, जाताना माणूस रिकाम्या हातांनी येतो जातो. मध्ये सगळं माझं माझं म्हणतो नंतर सोडून जातो. बऱ्याच जणांना प्रश्नाचं उत्तर विचारलं पण उत्तर मिळेना!

एका रात्री मग आत्महत्या करायचं ठरवलं. बहिणीच्या लग्नामुळे बेत पुढे ढकलला. दिल्ली स्थानकावर स्वामी विवेकानंदांचं पुस्तक वाचनात आलं. त्यानंतर त्यांची बरीच पुस्तकं वाचली अन् जीवनाचं कोड उलगडत गेलं. एक गोष्ट समजली. माणसाला मनुष्यजीवन मिळालं ते सेवेसाठी. आत्म्याचं कल्याण, जीवनाचं सार्थक सेवेतूनच होतं. आणि जे सुखसमाधान माणसाला हवं असतं ते सेवेतूनच त्याला मिळतं. पाकिस्तानच्या लढाईत **मी** वाचलो, याचाच अर्थ ती ईश्वरी इच्छा होती. मग आमरण सेवा करण्याचं ठरवलं. मी लग्न केलं नाही एवढंच ! पण माझा प्रपंच सुटला नाही. फक्त त्याची व्याख्या बदलली. चार भिंतीत जो छोटा प्रपंच करायचा तो मोठा झाला. माझ्या छोट्या प्रपंचात मी दोन-तीन मुलांना जन्म दिला असता. त्यांना पदवीधर, द्विपदवीधर केलं असतं. पण आता मी कितीतरी मुलांना शिक्षण देतो. त्यांना पदवीधर करतो. उलट प्रपंच वाढलाय !

**सेवेतून मिळणारा आनंद**

केवळ धन कमावणं हे जीवनाचं अंतिम ध्येय कधीच होऊ शकत नाही, तर सेवा हेच जीवनाचं अंतिम ध्येय असू शकतं. सेवेतून मिळणारा आनंद वर्णायला शब्द अपुरे पडतात. पण त्यातून सर्व थकवा नाहीसा होतो. तहानभुकेचं भान राहात नाही, जेव्हा आपण दुसऱ्यासाठी काही करतो आणि त्याच्या चेहऱ्यावर समाधान दिसतं, त्याचा होणारा आनंद अपूर्व असतो. तो आतून मिळतो. कोणत्या मोबदल्यासाठी अथवा पुरस्कारासाठी सेवा करणं योग्य नव्हे. अशावेळी पुरस्कार पुढे पळत असतो आणि माणूस मागे. आपण आपलं कर्तव्य करीत राहावं पुरस्कार येतील, न येतील !

सेवेचा खरा अर्थ गीतेत आहे.

**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।**

कर्तव्य करत रहा. फळाची अपेक्षा न करता. आपल्या मार्गात अडचणी येणारच. अडचणी या कार्यकर्त्यांच्या कसोट्या असतात. निसर्ग आपल्याला सांगतो ते हेच की ज्या झाडाला फळे लागतात त्यालाच लोक दगड मारतात. लोकांकडून काम करताना विरोध होणारच. म्हणून अपमान सहन करून काम केलं पाहिजे. कोण काय म्हणतं याच्याकडे लक्ष द्यायचे नाही. आपलं काम आपण करत राहायचं. कामाची पातळी जसजशी वर चढते, तसतसा विरोध खाली येताना दिसतो आणि नंतर तो संपतो.


**इतरांसाठी जगायला शिका**

शेतात दाण्यांनी भरलेली कणसं आपल्याला दिसतात. पण त्याची पार्श्वभूमी लक्षात घेतली तर समजेल की त्यासाठी एका 'बी' ने स्वत:ला जमिनीत गाडून घेतलेलं असतं. स्वत:ला गाडून घेऊन ती नष्ट होत नाही, तर हजारो दाण्यांना जन्म देते. जे असे समजतात की गाडून घेतल्यावर दाणे नष्ट होतात, ते पीठाच्या गिरणीत भरडले जातात आणि पीठ होतात.

आपले राष्ट्रपुरूष आपल्याला सांगतात की, जी माणसे स्वत:साठी जगतात, ती कायमची मरतात, जी इतरांसाठी जगतात, ती कायमची जगतात. म्हणून कार्यकर्त्यांनीच ठरवायचं की मला जगायचं की मरायचं? जर आपल्याला जगायचं असेल तर कोणासाठी तरी मरायला हवं. पण ती मरत नसतात, ती तर अमर होतात.


**आपल्याला मिळालेलं स्वातंत्र्य सहजासहजी मिळालेलं नाही. यात कित्येकांचं बलीदान आहे. त्या सर्वांचं फार मोठं ऋण आपल्यावर आहे. यासाठी आपल्यातला काही वेळ आपण समाजासाठी देणं हे आपलं कर्तव्य आहे.**

# मुंगी उडाली आकाशी



**पुणे मराठी ग्रंथालयाच्यावतीने यंदाचा 'मातृस्मृती पुरस्कार' पुष्पाताई नडे यांना मिळाला. 'हा 'स्व'-रूपवर्धिनीचा सन्मान आहे.' अशा विनम्रभावाने त्यांनी तो स्वीकारला. परंतु 'मुंगी उडाली आकाशी, तिने गिळिले सूर्यासी' अशी पुष्पाताईंच्या जीवनाची घडण आहे. या पुरस्काराच्या निमित्ताने आपल्या जीवनातील महत्त्वाच्या टप्प्याचं शब्दांकन अलिप्तपणे करण्याचा त्यांचा हा प्रयत्न.**

ती अशीच घरात झुरत बसली होती. शांत... निशब्द... - पण मनात मात्र भावनांचा कोंडमारा, एक अस्वस्थ घुसमटणं. तिच्या गुरूंना तिची ती अवस्था पाहवेना. त्यांच्याबरोबर सतत भांडणारी, नाना प्रश्न विचारणारी तिची उत्साही मूर्ती त्यांच्या डोळ्यांसमोर दिसत होती आणि आताचं हे चित्र ... असं का व्हावं? तिच्या घरातल्यांनाही हे पाहवेना. उद्रेकाने एखाद्या मनाचा स्फोट व्हावा, 'पुरे आता हे घराबाहेर राहून काम करणं ! तुला अगदीच अशा कामाची हौस असेल तर घरसुद्धा समाजात मोडतं हे लक्षात ठेव. लष्करच्या भाकरी भाजून काय मिळालं तुला शेवटी ?'



**एका आईची व्यथा**

खरंच काय मिळालं? काही दिवसांपूर्वीचं चित्र तिच्या मनाभोवती फेर घालायचं. मुलांसाठी काम करणारी एक संस्था आणि त्यातली ती एक माता. ती दोनशे मुलं तिचीच नव्हती का? 'ए मम्मी, मी आज तुझ्याकडे राहायला येणार!' असं म्हणत एखादं छकुलं तिला बिलगायचं. संस्थेतील इतर माता तिला म्हणत, 'पहा ग! हा अजिबात ऐकत नाही. तू तरी सांग.' 'ती येते' असं ऐकलं तरी मुलं गप्प होत व तिलाच नंतर विळखा मारत. प्रेमानं सारं काही जिंकता येतं, हे ती मुलांकडूनच तर शिकली. अशा या कामात असमाधानी तरी कसं म्हणायचं? ते तर स्वर्गसुखाहूनही जास्त होतं !

या मुलांच्यात आपलं आयुष्य चंदनासारखं झिजून जावं, असं तिला मनोमन वाटत होतं. त्या स्वप्नातच किती वर्षं उलटून गेली हे कळलंसुद्धा नाही ... पण या कालावधीत मात्र अधिकारी वर्ग बदलत राहिला. त्या प्रत्येकाचे नियम वेगळे खुर्चीभोवती फिरत राहणारे. त्याचा त्रास मात्र

सर्वच मातांना व्हायचा. निमूटपणे सहन करून आपलं काम करत राहायचं. पण कुठेतरी संबंध यायचाच आणि फार असह्य व्हायचं. मुलांचा दोष नसताना त्यांना संस्थेतून हाकलून देणं तिच्या सहनशक्तीबाहेरचं होतं. अशावेळी तिच्या गुरूंबरोबर, क्वचितप्रसंगी अधिकाऱ्यांबरोबर तिचं कडाक्याचं भांडण व्हायचं.

'तुम्ही हे फार वाईट करता. त्यांना बाहेर कोण विचारणार? त्यांना मदत कोण करणार! खरंच, तुम्ही समाज सुधारण्याचं काम करता की समाजात घाण निर्माण करण्याचं?' गुरू म्हणत, 'हे पहा इतका जीव लावणं चांगलं नाही. तुलाच त्रास होईल?' यावर ती उसळे, 'मग, तुमच्या संस्थेचा उद्देश तरी काय? आम्ही काय प्रेमाचं, कामाचं नाटक करायचं?' खिन्न मनाने ती आपल्या पिलांकडे परतत असे. या मुलांनाही उद्या हे असंच करणार का? मुलांच्या भविष्याच्या आशंकेने ती अस्वस्थ व्हायची.

वादाचे प्रसंग वाढतच राहिले. छोट्या छोट्या कारणांवरून तिला त्रास द्यायला सुरूवात झाली. अन्य माताही तिला गप्प बसवू लागल्या, 'तुला काय करायचं आहे? ही मुलं आपली थोडीच आहेत!' दरी वाढतच गेली. ती एकाकी पडली. छोट्या पिंकीचे स्वागत, मुलांचे साजरे केलेले वाढदिवस, संस्थेत कोणी पाहुणे येणार म्हटल्यावर त्यांच्या स्वागतासाठी चालणारी लगबग; रात्री एकत्र झोपताना 'मीच मम्मीच्या शेजारी झोपणार' म्हणून होणारी भांडणे. सारे प्रसंग तिच्या डोळ्यांसमोर फिरत होते. या मुलांची पाखरमाया सोडून जाणं ही कल्पनाच ती करू शकत नव्हती.

**लाडक्यांचा निरोप**

संस्थेतल्या राजकारणाला कंटाळून शेवटी तिने राजीनामा दिला. परंतु मुलांना सोडून जाणं तिच्या जीवावर आलं होतं. अबोल, असहाय्य नजरा तिला मागे खेचत होत्या.

'मम्मी, आमचं काही चुकलं का ग?'

'नाही रे माझ्या राजांनो ! तुमचं काहीच चुकलं नाही. तुम्हाला जन्माला घालणारी मोठी माणसे चुकली होती. आणि आता तुमच्यावरील मायेचं छत्र काढून घेणारी मोठी माणसं सुद्धा चुकताहेत !'

ती तेथून बाहेर पडली. मनोमन परमेश्वराला साकडं घातलं. 'हे देवा! या माझ्या मुलांना कणखर बनव. त्यांना धीट कर. न रडण्याची शक्ती दे'. तिच्याबरोबर तिची एक जिवलग सखीसुद्धा बाहेर पडली ....

**आशेची पहाट**

दु:स्वप्न संपलं व हळुवारपणे, मायेच्या हलक्या स्पर्शाने जागं व्हावं, तशी तिच्या मनात पहाट उगवली. प्रकाशाचा स्पर्श होताच मनातला काळोख विरायला लागला. तिचे गुरू तिला दुसऱ्या एका संस्थेची माहिती देत होते. आशेची किरणे दिसत होती, पण मनाच्या एखाद्या कोपऱ्यात शिल्लक राहिलेला काळोख विचारत होता, 'पुन्हा असाच कटु अनुभव तर येणार नाही ना? नको. पुन्हा अशी अवस्था करणारी बांधिलकी नको!'

*With Best Compliments from :*

**ASHA CONSTRUCTION COMPANY**

Surekha Apartments, Opp. Octroi Naka,
Pune-Satara Road, Pune 411 009. Tel : 431111

गुरूंच्या आश्वासक शब्दांनी तेही मळभ दूर झालं.

तो दिवस तिला अजूनही आठवतो. बैठक सुरू होती. तिला हे सर्व नवीनच होतं. प्रत्येकजण आपला परिचय करून देऊन कामाचे अनुभव व नव्या कल्पना सांगत होता. तिला या माणसांची माहिती नव्हती. पण तिला त्या प्रत्येकातून पहिल्या संस्थेचा अधिकारी वर्ग दिसत होता. तिची पाळी आली. तिने आपलं नाव सांगितलं, तिला बरंच काही बोलायचं होतं. पण ते मनातच राहिलं. आवेगाने ती म्हणाली, 'आई व मुलं हे नातं काय असतं हे मी फार जवळून पाहिलं आहे' त्यापुढे तिला शब्दच सुचेनात. अस्वस्थपणे ती खाली बसली. बैठक संपली तसे एक सद्गृहस्थ तिच्याजवळ आले. तिची व तिच्या पहिल्या कामाची चौकशी केली. तुम्ही निश्चिंतपणे येथे काय काम करू शकाल?' अशी विचारणा केली. 'मी सध्या इथे एक बालवाडी सुरू करू का?' तिने थोडसं अविश्वासानेच विचारलं. होकार मिळाला, एक नवा दिनक्रम सुरू झाला.

**इवलेसे रोप लावियले द्वारी**

'स्व'-रूपवर्धिनीतील तो तिचा पहिला दिवस. शैक्षणिक क्षेत्रात काम करणारी ही संस्था. इथे आपल्या पहिल्या कामातील अनुभवाचा फारसा उपयोग होणार नाही असे वाटून तिने बालवाडीचा प्रस्ताव पुढे केला. 'आपल्याभोवती मुलांनी हसावं, बागडावं' अशीच तिची इच्छा होती. 'पाकोळी' बालवाडी सुरू झाली व तिची हरवलेली पाखरमाया तिला पुन्हा मिळाली. एकशेऐंशी बालके व सहा शिक्षकांपर्यंत येऊन स्थिरावलं. कामातून काम वाढत मुलांच्या मातांसाठी काही करावं असं वाटलं. त्यातून शिवणवर्ग, गृहशुश्रुषा वर्ग, बालवाडी प्रशिक्षिका वर्ग असा शारदामणि महिला विभाग कार्यरत झाला. 'इवलेसे रोप लावियले द्वारी, तयाचा वेलु गेला गगनावरी' याचा अनुभव आला.



खरं म्हणजे, या संस्थेत पाचवीच्या पुढील विद्यार्थ्यांचे शिक्षण व्हायचे. पुढे युवकगटात आल्यावर आपल्या शिक्षणाबरोबर येथील शाखा सांभाळणारे विद्यार्थी येथे होते. त्यांच्या गुणांनी ती दिपून गेली. आपण इथे फार कमी आहोत, फार खुजे आहोत, असे तिला वाटू लागलं. म्हणून तिने ठरवलं. आता नुसतं भावनेच्या आहारी जाऊन रडत बसायचं नाही तर समाजाबरोबर चालून आपलं स्थान आपण निर्माण केलं पाहिजे. काम करता करता पुढे आपणही शिक्षण घ्यायचं तिने ठरवलं. व ते तिनं चिकाटीने चालू ठेवलं.

**विस्तारलेलं घर**


या नवीन कामात ती दिवसेंदिवस रमू लागली. इथे कोणी मोठं नाही की कोणी छोटं ! शिबिरात, सहलीत, वास्तूत तिला काम करताना कधीही बंधनं आली नाहीत की कोणी रोखलं नाही. उलट प्रत्येकवेळी तिच्या नवीन नवीन कामांचं स्वागतच झालं. पुढे हीच माणसं तिची काळजी घेऊ लागली. तिला ही संस्था अशी कधी वाटलीच नाही. हे आपलं एक घर आहे, एक मोठं कुटुंब आहे आणि या मोठ्या कुटुंबात आपलं एक स्थान आहे, याची सुखद जाणीव तिला दिलासा देत राहिली. त्या नादात कित्येक वेळा आपल्या घरी आपली माणसं वाट पाहताहेत याचं भान सुटायचं. पण तिचं सर्व

घरच या मोठ्या कुटुंबात सामावलं गेल्यानं लटकंच रागावणं व्हायचं. वर्धिनीच्या शाखांवर जाऊन, तिथल्या मुलांचं काम पाहून आपल्याला काही घेता येईल का याचं निरीक्षणही चालू असतं.

**पुरस्कार तर सर्वांचा !**

एक दिवस अचानक तिच्या हातात एक पत्र मिळालं. पत्र उलगडलं अन् तिला आश्चर्याचा धक्काच बसला. क्षणभर डोळे भरून आले. तिने आतापर्यंत केलेल्या कामाची ती परिणती होती. 'मातृस्मृती पुरस्कार!' तिच्या कानामध्ये वडिलांचे शब्द रूंजी घालू लागले. 'दुसरे काय म्हणतात, यापेक्षा आपलं मन काय सांगतं याकडे माणसानं लक्ष द्यावं. आपलं मन आपणास खरं प्रमाणपत्र देत असतं आणि ते खरं समाधान आहे.'

खरं म्हणजे तिला मिळालेला पुरस्कार हा तिचा नव्हताच ! तो तेथील सर्व कार्यकर्त्यांचा होता. त्यांच्याकडून ती शिकत होती; कामात रमत होती; त्यांच्या प्रेमळ सहवासात न्हात होती. आपल्या सहकाऱ्यांच्या अंगात फाटका शर्ट आहे म्हणून अंगात दोन शर्ट घालून येणाऱ्या छोट्या मुलाकडून ती शिकली, दुसऱ्यांच्या उपयोगी कसं पडायचं ते! आपल्या मित्रानं वर्गात केलेली ओकारी, आपल्या अंगातील शर्टाने पुसणाऱ्या युवकाकडून ती शिकली. घार जशी आपल्या पिलांकडे धाव घेते, तसं कारखान्यातून काम आटोपून तातडीने दूरच्या शाखेकडे धाव घेणाऱ्या युवकाकडून, घड्याळाच्या काट्यांवर लक्ष न ठेवता सातत्याने मुलांशी सायकलवरून संपर्क साधणाऱ्या युवकांकडून ती शिकत होती, स्वत:ची तहानभूक विसरून काम करणारे असे अनेक. वैद्यकीय परीक्षेचा अभ्यास करतानादेखील सतत मनात शाखेच्या कामाची काळजी वाहणारी युवती पाहिली की तिचे मन भरून येतं ! कोणताही कार्यक्रम आला की, वर्धिनीच्या वास्तूला कौटुंबिक सोहोळ्याचंच स्वरूप येतं. आपली जबाबदारी व्यवस्थितपणे सांभाळून, इतरांनाही मदत करता येते हे येथील कार्यकर्त्यांकडून ती शिकली, अजूनही शिकते आहे. त्यामुळे हा पुरस्कार तिला तिचा वाटलाच नाही तो या सर्वांचाच तर होता.



**विद्यार्थी म्हणूनच राहू दे**

सर्वात महत्त्वाचे म्हणजे वयाची सत्तरी ओलांडूनही पंचविशीच्या तरुणाला मागे सारेल अशा उत्साहाने काम करणाऱ्या श्री. कृ. ल. पटवर्धन सरांकडून ती खूप काही शिकली. त्यांनी तिला प्रत्येक वेळी काम करताना आलेले अनुभव सांगावेत व ते अनुभव डोक्यात घेऊन तिने घरी जावे. अजून आपण फार कमी पडतो, खूप काही केले पाहिजे, असे म्हणून तिच्या कामाचा उत्साह वाढत असे. तसेच भारतीय मजदूर संघाचं काम, चिमुकला संसार सांभाळून प्रत्येक ठिकाणी आपली भूमिका अगदी मनापासून पार पाडणारे श्री. शिरीष पटवर्धन यांच्यापासूनही ती खूप काही शिकली. आता तिच्या कामाचा व्यापही वाढला आहे. ती सतत परमेश्वराकडे एकच प्रार्थना करत असते, 'हे परमेश्वरा, माझा हा उत्साह, ही उमेद तसूभरही ढळू देऊ नकोस, सतत नवीन काहीतरी करण्याची उमेद वाढू दे आणि आयुष्यभर विद्यार्थी म्हणून राहू दे !'

**

*जीवन म्हणजे सुखदु:खाचा*
*मजेदार हा असे झुला ।*
*उदास होणे धर्म न माझा*
*जगणे ही तर एक कला ।।*

# चाकोरीबाहेरचे शिक्षण

— श्री. अजय कदम

श्री. किशाभाऊ पटवर्धन व त्यांच्या सहकाऱ्यांनी १३ मे, १९७९ रोजी पुण्यातील पूर्वभागामध्ये 'स्व'-रूपवर्धिनीची सुरूवात केली. हुशार, चुणचुणीत मुले शोधून त्यांच्या विकासाच्या आड येणारे अडथळे दूर करण्याचा प्रयत्न 'स्व'-रूपवर्धिनी करते. शिक्षण व संस्कारांच्या माध्यमातून समाजातील हे मोलाचे धन एकत्रित करून त्यातून संघटनात्मक काम उभे करणे व सामाजिक बांधिलकीची जाणीव जागविणे हा वर्धिनीच्या विचारांचा पाया आहे.

**मला काय त्याचे ???**

सध्या समाजामध्ये प्रचंड मानसिक मरगळ आली आहे. मला काय त्याचे? असा विचार करून अलिप्त राहण्याची मनोवृत्ती वाढते आहे. ही मनोवृत्ती समूळ उपटून काढण्याची मानसिक ताकद 'स्व'-रूपवर्धिनीला नव्या पिढीत उभी करायची आहे. त्यासाठी शिक्षण हे एक माध्यम आहे.

मुलांच्या सर्वांगीण विकासाचा प्रयत्न येथे आहे. शालेय विषयांचे शिक्षण येथे आहे. परंतु त्याचबरोबर गणेशोत्सव, सहली, शिबिरे, रक्तदान इत्यादी कार्यक्रमांतून मुलांच्या सुप्त शक्तींना उभारी देण्याचा प्रयत्न इथे होतो.

**तरूणांची शक्ती सत्कारणी लागावी**

गणेशोत्सव हा संपूर्ण पुणे शहराचा जिव्हाळ्याचा विषय. या दहा दिवसात तरूणांच्या शक्तीला उत्साहाचे उधाण आलेले असते. त्याला चांगली दिशा दाखविण्याचा व या उत्सवाचा हरवलेला सामाजिक आशय पुन्हा मिळवून देण्याचा अल्पसा प्रयत्न वर्धिनीत सुरू आहे. या दहा दिवसात वर्धिनीचे छोटे वर्धक व वर्धिका समाजातील अनिष्ट प्रथा व चालींविरूद्ध जनमानसाला जागृत करण्याचे काम उदा. हुंडाबळी, व्यसनमुक्ती, साक्षरता या पथनाट्यांद्वारे करतात.

गणेशविसर्जन मिरवणूकीत छोट्या मुलांची शिस्तबद्ध पथके, तरुणांची आकर्षक अशी ध्वजदलाची, वेत्रचर्माची पथके चैतन्य आणि उत्साहाचे वातावरण निर्माण करतात. त्यातून भगव्या झेंड्याचे आपलेही शिस्तबद्ध पण जोशपूर्ण पथक असावे, असे काही तरूणांना वाटते आहे.



सिनेमाच्या गाण्यांवर ठेका न धरता ढोलताशाच्या धुंद लयीत हरवून जावे असे वाटणाऱ्यांची संख्या वाढते आहे. एक-दोन मंडळांनी उत्स्फूर्तपणे पुढे येऊन असे पथक उभारण्याचा प्रयत्न केला. सुरूवातीला आपल्या काही कार्यकर्त्यांनी त्यांना त्यासाठी सहकार्य केले. त्यातून त्यांचे स्वयंपूर्ण ध्वजदल उभे राहिले. अशा पथकांची संख्या वाढली, तर मिरवणूकीचे स्वरूप पालटायला वेळ लागणार नाही.

**नेतृत्वाची पहिली पायरी**

गणेशोत्सवासारख्या कार्यक्रमांच्या तयारीतून होणारे मुलांचे शिक्षण महत्त्वाचे आहे. एकत्रित, लयबद्ध हालचालींतून मुलांची मनेही एकत्र येतात. पथकासाठी आवश्यक साहित्याची जमवाजमव वा दुरूस्ती करताना नियोजनाचे व कामाच्या शिस्तीचे शिक्षण मिळते. कामे वाटून घेऊन, आपली जबाबदारी अत्युत्तमपणे पार पाडण्याची सवय लागते. पथके घेणाऱ्या आठवी - नववीतील मुलांमधून सहजपणे नेतृत्व उभे राहते. **व्यावहारिक जगाचे भान अशा प्रसंगी येतेच. परंतु बेभान होऊन काम करण्याची भावी आयुष्यातील शिदोरी येथे बांधली जाते.** अशा उत्सवांचा हा सर्वात मोठा फायदा आहे.

**सहलींचे वेगळेपण**

वर्धिनीच्या सहली, शिबिरांतही हे वेगळेपण जाणवते. वर्धिनीच्या सहली म्हणजे केवळ मौजमजा, भटकंती एवढेच नव्हे तर, देशभक्तीचे शिक्षण त्यात मिळते. युवकांबरोबर होणाऱ्या विविध विषयांतील गप्पांतून सहजपणे चांगल्या गोष्टी शिकता येतात. मुलांशी जवळीक होणे, त्यांची खऱ्या अर्थाने ओळख होणे हे सहलीतून साधते. आईबाबांपासून दूर असल्याने स्वावलंबनाचे शिक्षण, दोन तीन दिवस अडीअडचणींच्या प्रसंगावर मात करताना येणारी निर्भयता, प्रसंगावधान, आपल्या शारीरिक कुवतीची परीक्षा या गोष्टी सहजपणे येतात. आपल्या गटासमोर आलेली अडचण दूर करताना स्वत:च्या जबाबदारीने निर्णय घेण्याची सवय यातून लागते. असे अनौपचारिक पण आवश्यक शिक्षण वर्धिनीच्या सहली, शिबिरांतून मिळत असते.

अशाचप्रकारच्या सहज शिक्षणातून मुलांच्या सर्वांगीण विकासाचा प्रयत्न 'स्व'-रूपवर्धिनीत होतो. अशा प्रयत्नांची आज समाजाच्या सर्वच थरांमध्ये आवश्यकता आहे. स्वामी विवेकानंदांनी पाहिलेले 'समर्थ भारताचे स्वप्न' साकारण्याचा हाही एक मार्ग असेल का? ●●●

***खऱ्या अध्यापनाचे पहिले सूत्र हे की, काहीही शिकवता येणे शक्य नाही. मात्र प्रत्येक गोष्ट शिकता येणे शक्य आहे. विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी प्रवृत्त करणे, हे अध्यापकांचे पहिले कर्तव्य आहे.***

— योगी अरविंद

*With Best Compliments from :*

**M/s. Metafin Processor And Brite Electroplates**

Tophkana, Shivajinagar,
Pune – 411 005.

## महत्त्वाच्या घटना

**ऑगस्ट १९९२**

१३ विविध रुग्णालये, अंधशाळा, उपेक्षित वस्त्यांमध्ये सुमारे ३,००० बांधवांना रक्षाबंधन

१५ विवेकानंद शाखेवर एकत्रिकरण

**सप्टेंबर १९९२**

५ पद्मश्री डॉ. बानू कोयाजी यांच्या हस्ते माता-बाल-आरोग्यकेंद्राचे उद्‌घाटन.

८ निवेदिता शाखेची ५ ठिकाणी पथनाट्ये विषय : अंधश्रद्धा, सामाजिक आरोग्य, हुंडाबळी

१० गणेश विसर्जन मिरवणुकीत सहभाग एकूण ३०० उपस्थिती

१४ शारदामणि महिला विभागाचे शिबिर, संख्या - ३०

**ऑक्टोबर १९९२**

१ पुणे महानगरपालिकेतर्फे विशेष रक्तदान कार्याबद्दल 'स्व'-रूपवर्धिनीला स्मृतिचिन्ह.

६ के. ई. एम. रुग्णालयातर्फे ८० मुलांचे लसीकरण.

२०/१० ते १५/११ दहावी अभ्यास शिबिर- बीड जिल्ह्यातील सोनदरा गुरुकुलाचे चार विद्यार्थी, संभाजीनगरचे पाच व साताऱ्याचे तीन विद्यार्थी सहभागी. संख्या - ५०

२९ ५ वी ते ७ वी चे शिबिर संख्या १०५, विषय - शिवकालीन इतिहास स्थान — पुणे विद्यापीठ

**नोव्हेंबर १९९३**

२ ते ७ निवेदिताचे शिबिर संख्या-५०

**जानेवारी १९९३**

१७ संक्रमण उत्सव, बाल गंधर्व रंगमंदिर

२६ अखंडानंद शाखेवर एकत्रिकरण

**फेब्रुवारी १९९३**

८ ते २१ रामकृष्ण व विवेकानंद शाखेवर दहावी मार्गदर्शन वर्ग

**एप्रिल १९९३**

१४ रक्तदान शिबिर संकलन - १३७ बाटल्या जिल्हाधिकारी कचेरीजवळ पाणपोई सुमारे ७,००० जणांना लाभ. डॉ. निर्मळे यांच्या हस्ते उद्‌घाटन

१६ ते १८ बालशाखेचे प्रथमच शिबिर संख्या - ३५

२४ ते २७ ८वी ते १०वी शिबिर विषय - शिवकालीन इतिहास संख्या - ११०

३० **पुणे मराठी ग्रंथालयाच्या वतीने मा. पुष्पाताई नडे यांना 'मातृस्मृती' गौरव पुरस्कार खा. सुमित्रा महाजन यांच्या हस्ते प्रदान.**

**मे १९९३**

१३ विस्तारित २ मजल्यांचे उद्‌घाटन, हस्ते - पद्मभूषण अण्णासाहेब हजारे, प्रमुख पाहुणे - मा. श्री. प्रल्हादजी अभ्यंकर.

२२ आंतरराष्ट्रीय जलसंपत्ती पुरस्कार विजेते मा. माधवराव चितळे यांचा ज्ञान प्रबोधिनी व वर्धिनीच्या वतीने सत्कार.

**जुलै १९९३**

७ युवक शिबिर

१२ स्थान - राळेगण सिद्धी
उपस्थिती - ५८

१५ तातडीचे रक्तदान शिबिर
संकलन - ७२ बाटल्या

२४ अखंडानंद शाखेवर प्रथमच रक्तदान शिबिर, संकलन - ३८ बाटल्या.

२७ कर्वेनगर परिसरात सुबोधानंद शाखा सुरू.

**ऑगस्ट १९९३**

१५ विवेकानंद शाखेवर एकत्रिकरण
वक्त्या - मा. सुशीलाताई आठवले.

२२ मा. यशवंतराव लेले यांच्या हस्ते कौटुंबिक सल्ला केंद्राचे उद्घाटन.

**सप्टेंबर १९९३**

६ निवृत्त माध्यमिक शिक्षकांतर्फे मा. कृ. ल. पटवर्धनसरांना 'मधुसंचय' पुरस्कार.



२९ गणेश विसर्जन मिरवणूक
संख्या - २७०
बालशाखेचे रुमालांचे पथक.

**या वर्षीच्या सहली —**

*कात्रज- सिंहगड, राजगड, राजगड- तोरणा, लोहगड, हरिश्चंद्रगड, धनगड- कोरीगड- तेलबैला - नाडसूर लेणी, ढाकची बहिरी, लोणावळा, खंडाळा, तुंग - तिकोना.*

●●●

## सातवीच्या वर्गात डंकल प्रस्ताव

सध्या देशभर सर्वत्र 'डंकल' प्रस्तावाची गरमागरम चर्चा सुरू आहे. पण अनेक मोठ्या व्यक्तींनासुद्धा त्यासंबंधाने पुरेशी माहिती नसते. त्यामुळे इयत्ता सातवीतील एका वर्धकाने वर्गातील मुलांना डंकल प्रस्तावाची माहिती देऊन, त्याच्या शिक्षकांना आश्चर्याचा धक्काच दिला. शाळेतील एका मोकळ्या तासाला त्याने मुलांना केवळ दहा मिनिटात डंकल प्रस्ताव काय आहे? त्याचे फायदे-तोटे काय? याची मुद्देसूद माहिती दिली. शिक्षकांनी त्याला त्यासंबंधाने विचारल्यावर तो म्हणाला, 'आमच्या 'स्व'-रूपवर्धिनीतील युवकांनी एका बैठकीत आम्हाला ही माहिती दिली व ती लक्षात ठेवून मी मुलांना सांगितली. कारण त्यामुळे भारत अडचणीत येण्याची शक्यता आहे.'

●●

# असे वक्ते, अशी व्याख्याने

१) श्री. विवेक पोंक्षे — इस्रायलमधील किबुत्झ व युवक चळवळ
२) श्री. पुरुषोत्तमभाई श्रॉफ — सांस्कृतिक कोष व उपनिषदे
३) श्री. वासुदेवराव धोटे, पोलिस उपायुक्त — बाँबपासून संरक्षण (प्रात्यक्षिकासहित)
४) श्री. पु. स. पाळंदे, माजी आयुक्त पुणे महानगरपालिका — पुण्याचे आयुक्त असतानाचे अनुभव
(अटलबिहारी वाजपेयी यांचे अविश्वास ठरावावरील संसदेतील भाषण) (चित्रफित)
५) श्री. माधवराव चितळे — भारतातील जलसंपत्ती नियोजन
६) श्री. श्याम बापट — खेळातून व्यवस्थापन शिक्षण
७) श्रीमती सरोजिनी बाबर — सण व उत्सव
८) श्री. राजाभाऊ लिमये — स्वामी विवेकानंद
९) श्री. अभ्यंकर — पाऊस कसा मोजावा!
रेल्वेचे वेळापत्रक कसे पाहावे?
१०) श्री. दि. दा. जोशी — क्रांतीवीर यतींद्रनाथ
११) श्री. विलासराव चाफेकर — स्त्रीशक्ती व सद्यस्थिती
१२) श्री. प्रभाकर वाडेकर व श्री. चारूहास पंडित — सकाळमधील 'चिंटु'
१३) श्री. प्रमोद बेहरे — डॉ. अल्बर्ट श्वायत्झर यांचे चरित्र.
१४) सौ. माधवीताई पटवर्धन — अब्राहम लिंकनचे शिक्षकांना पत्र
१५) श्री. प्रमोद लेले — आसाममधील कामाचे अनुभव
१६) श्री. देशपांडे — गंगा कावेरी प्रकल्प
१७) श्री. प्र. के. घाणेकर — असे आमचे पुणे

*With Best Complimnents From :*

**M/s. Decent Decorators**
FOR QUALITY COATINGS

81-D-2, M.I.D.C. Chinchwad,
PUNE - 411 009.
Phones : 773730, 772333

# या बंधू सहाय्याला हो !

**किल्लारी, उमरगा परिसरात दि. ३० सप्टेंबर ९३ ची रात्र भूकंपाचा शाप घेऊन उगवली. हजारो निष्पाप जीव मातीच्या ढिगाऱ्याखाली गुदमरले. कोट्यावधी रूपयांची वित्तहानी झाली. जे वाचले त्यांचे दुःख मोठे होते. त्यांच्या डोळ्यातील आसवे पुसायला, पाठीवरून मायेचा हात फिरवायला देशभरातून हजारो बांधव पुढे आले. मदतकार्याच्या या प्रचंड कामात 'स्व'-रूपवर्धिनीचा खारीचा वाटा जरूर आहे.**



वर्धिनीच्या पन्नास-साठ युवकांची तातडीची बैठक त्या दिवशी संध्याकाळी झाली. त्यात मदतकार्याचा साकल्याने विचार झाला. बघ्यांच्या भाऊगर्दीत सामील होण्यापेक्षा थोड्या उशीराने प्रत्यक्ष मदतकार्यासाठी जाण्याचे निश्चित झाले. पण तातडीची गरज म्हणून आर्थिक निधी गोळा करण्याचा संकल्प झाला व तशी रचनाही झाली.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, जनकल्याण समितीमार्फत हा निधी पोहोचविण्याचे ठरले. सर्व शाखांना त्याचे उद्दीष्ट निश्चित करून दिले. त्याप्रमाणे अल्पावधीतच सुमारे पासष्ट हजार रुपयांचा निधी आपण या कामासाठी गोळा करू शकलो. निधीसंकलनातील अनुभवही आनंददायी आहेत.

**बालचमूचा वाटा**

बालशाखेतील ७-८ वर्षांच्या बालचमूंचे येथे विशेष कौतुक करायला हवे. त्यांनी आपले खाऊचे पैसे रुपया, दीडरुपया निधित जमा केले. त्याबरोबर आपल्या परिसरातही त्यासाठी हिंडले. यातीलच **एका तिसरीतील विद्यार्थिनीला शेजाऱ्यांनी विचारले, "तू एवढे पैसे गोळा करतेस. पण ते भूकंपग्रस्तांना नक्की पोहोचतील का?" त्यावर ती लगेच उत्तरली, "मी वर्धिनीत पैसे देणार आहे. त्यामुळे ते नक्की पोहोचणारच!"** या छोट्या मुलांच्या मनात वर्धिनीबद्दल असलेल्या विश्वासाची ही पावतीच नव्हे का?

पालक व शिक्षकांनी स्वतः पैसे दिलेच, शिवाय आपल्या शेजाऱ्यांकडून, कामाच्या ठिकाणाहून पैसे गोळा करून वर्धिनीत पाठविले. एका वसाहतीत काही मंडळांनी आधीच निधी गोळा केला होता. परंतु वर्धिनीचे कार्यकर्ते गेल्यानंतर, त्यांनी उत्साहाने पुन्हा वर्गणी गोळा करून सहाय्य केले.

**शाळा सुरू झाली**

विद्यार्थी परिषदेच्या योजनेतून वर्धिनीची नऊ जणांची पहिली तुकडी 'मंगरूळ' या गावी

मदत कार्यासाठी गेली. प्राथमिक सर्वेक्षण व गावकऱ्यांमध्ये उमेद जागविण्याचं महत्त्वाचं काम या तुकडीने केलं. नारायण धनावडेकडे या तुकडीचं नेतृत्व होतं. त्यानं ते जबाबदारीने सांभाळलं, इतकंच नव्हे तर, तेथे आलेल्या दोनशे-अडीचशे तरूणांच्या कामाच्या आखणीत त्याचा मुख्य सहभाग राहिला.

या आपत्तीच्या काळात इकडेतिकडे हिंडणाऱ्या शालेय मुलांकडे कोणाचे लक्ष गेलं नव्हतं. **नारायणने गावातील महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या तरूणांचा शोध घेऊन त्यांच्या सहकार्याने गावात शाळा सुरू करून दिली. या परिसरात आपत्तीनंतर सुरू झालेली ही पहिलीच शाळा.**



पहिली तुकडी परतल्यानंतर दोघा युवकांची दुसरी तुकडी व त्यानंतर चार महिलांची आणखी एक तुकडी मदतकार्यासाठी गेली. त्यांनीही समर्थपणे नंतरच्या कामाची आघाडी सांभाळली. आपत्तीच्या काळात काम करत असताना आलेले अनुभव या कार्यकर्त्यांनाही बरंच काही शिकवून जाणारे आहेत. पण त्याचबरोबर वर्धिनीच्या युवकांच्या मनात ही जाणीव नक्की आहे की, पुनर्वसनाच्या कामाचा व्याप प्रचंड आहे. त्यासाठी भावनावेगात केवळ एकदा जाऊन चालणार नाही, तर कामाची नियोजनबद्ध आखणी करून त्याठिकाणी दीर्घकाळ, सातत्याने काम करण्याची आवश्यकता आहे. ते करण्याचा संकल्प युवकांच्या मनात पक्का आहे.

•••

## कठीण समय येता .....

वर्धिनीतील एका युवकाच्या नातलगासाठी रक्ताची तातडीची गरज होती. त्यासाठी 'जनकल्याण' रक्तपेढीत जाणं झालं. त्यावेळी तेथील डॉक्टरांशी बोलताना असं लक्षात आलं की, सध्या पुण्यातील सर्वच रक्तपेढ्यांमध्ये रक्ताचा भयंकर तुटवडा आहे. त्यामुळे अनेक गरजूंना रक्तासाठी धावाधाव करावी लागते. अडचणीच्या या प्रसंगात 'स्व'-रूपवर्धिनीने मदत करावी अशी विनंती डॉक्टरांनी आपल्याकडे विश्वासाने केली.

प्रसंगाचे गांभीर्य लक्षात घेऊन आपण दि. १५ जुलैला तातडीने रक्तदान शिबिर घेण्याचे ठरविले. तयारीसाठी हातात केवळ चोवीस तास. परंतु कामाची विभागणी करून तातडीने सर्वत्र निरोप पोहोचले. या रक्तदान शिबिरात आपण ७२ बाटल्या रक्त संकलन करू शकलो. आणखी तीस एक जणांना अशक्तपणामुळे परत पाठवावे लागले. यातून परिसरातील आपल्या संपर्काची व शक्तीची जाणीव आपल्याला झाली.

पुढच्या आठवड्यात अखंडानंद शाखेच्या माध्यमातून बिबवेवाडी परिसरात रक्तदान शिबिराची योजना झाली. या भागातलं आपलं पहिलंच शिबिर. तेथेही ३८ बाटल्या रक्त जमा झालं. या कठीण प्रसंगी आपण उपयोगी पडू शकलो याचं समाधान सर्व कार्यकर्त्यांना नक्की आहे.

भूकंपग्रस्त बांधवांच्या वेदनेशी समरस होऊन आलेल्या
वासंतीताई यादव यांचे अस्वस्थ करणारे अनुभव त्यांच्याच शब्दात

## • हळुवार फुंकर घालायला हवी •

*मनात असंख्य प्रश्नांचे काहूर घेऊन भूकंपग्रस्त भागात काम करण्यासाठी लातूरच्या गाडीत बसलो. सहकार्यकर्त्यांचीही तीच अवस्था होती. ऐकलेली, वाचलेली, दूरदर्शनवर थोडी फार पाहिलेली भूकंपाची भीषणता डोळ्यासमोर नाचत होती. भूकंपाच्या विचारात गाडीतील प्रवासाची ती रात्र संपली. सकाळी ६.०० वाजता लातूरमध्ये उतरलो. तेथील कार्यकर्त्यांनी आमची लातूरच्या संघाच्या मुख्य ठिकाणी जाण्याची व्यवस्था केली. आम्ही माहेश्वरीभुवनमध्ये आलो. तेथे संघपरिवारातील सर्वच लहान-मोठे कार्यकर्ते अतिशय तत्परतेने शिस्तीने काम करीत होते.*

*विजयादशमीच्या दिवशी भूकंपग्रस्त प्रत्येक गावातील, प्रत्येक घरात नवीन साडी-चोळी, धोतर, टोपी, टॉवेल व फराळ वाटपाचा कार्यक्रम होता आणि त्याचे पॅकींगचे काम होते. त्या दिवशी दिवसभर तेच काम केले. दसऱ्याच्या दिवशी लातूरहून २३ मालमोटारी हे सगळे वाटपाचे सामान घेऊन निघाल्या. मी व पुष्पाताई एका मालमोटारीत बसलो. ती मंगरूळ, गुबाळ व नांदुर्गा या गावी जाणार होती. आम्ही नांदुर्गामध्ये उतरलो. तेथे काही घरात वाटपासाठी गेलो. घराघरातून एकच दु:ख, प्रत्येकाचे डोळे डबडबलेले. 'आमचा सण तुम्ही साजरा करायला आलात' अशी प्रतिक्रिया. एका आजीने माझे फक्त हात हातात घेतले, डोळे पाण्याने भरून आले आणि दु:ख, बोलके झाले. 'भूकंपाने आमचे सर्वच नेले. कुंकू लावायला कुंकवाचा करंडाही घरात नाही!'*

*नंतर चार दिवस आम्ही तळणीत मुक्काम केला. प्रत्येक घरात जाऊन भेट दिली. कुणी कुणाला सावरायचे? कुणी सुन्न मनाने सारे पाहात होते. कुणाला शब्दच फुटत नव्हते. सारे गावच दु:खाच्या खाईत बुडून गेले होते. माणसे किडा-मुंगीसारखी भरडली गेली होती. जे वाचले त्यांचे दु:ख, हाल पाहण्याच्या पलिकडे होते. प्रत्येक घरात कुणी, कुणी गेले होते. तरीही दु:ख उराशी घेऊन माणसे थोडा फार दैनंदिन व्यवहार करू लागले होते.*

*आजूबाजूने प्रचंड मदतीचा ओघ होता. परिवारातील कार्यकर्ते आपल्या बांधवांसाठी जीवतोड मेहनत करत होते. प्रत्येक घरात जाऊन मदतीचा हात पुढे करीत होते. प्रत्येक घराला सावरायचा प्रयत्न करीत होते.*

*तिथे जाऊन आम्ही काय केले? आमच्या जाण्याने बोलण्याने, त्यांचे दु:ख त्यांच्या अडचणी दूर झाल्या का? नाही. त्यांच्या दु:खावर एक हळुवार फुंकर घालून आम्ही परत आलो.*

*काळोख्या रात्री तांडव झाले*
*मृत्यूचे थैमान नाचत आले*
*कोसळल्या भिंती कोसळली घरे*
*घुसमटले श्वास भेदरली मने*
*हुंदके, हुंकारांनी शिवार भरले*
*फुलण्या आधीच फूल गळून पडले*
*होत्याचे नव्हते झाले !*

•••

# यशाचे मानकरी



**पराग लकडे**

स्थापत्य अभियांत्रिकी पदवी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण. 'स्व' रूपवर्धिनीचे वर्षभर पूर्णवेळ काम केले.

**गिरीश अडके**

शास्त्र शाखेत गणित विषयाची पदवी ७५% गुणाने उत्तीर्ण. गणित विषयात पदव्युत्तर शिक्षण सुरू. विद्यापीठातील मानाची शिष्यवृत्ती प्रथम क्रमांकाने मिळविली.

**पराग जगताप**

भौतिकशास्त्र विषयाची पदवी प्रथमश्रेणीत उत्तीर्ण. पुणे विद्यापीठात संगणक विषयातील पदव्युत्तर शिक्षण सुरू. भारतीय भौतिकशास्त्र परिषदेच्या वक्तृत्वस्पर्धेत तृतीय क्रमांक.

**प्रसाद जमखिंडीकर**

तृतीय अभियांत्रिकी परीक्षेत महाविद्यालयात द्वितीय क्रमांक ७५% गुण.

**श्रीकांत यादव**

अभियांत्रिकी पदविका प्रथम श्रेणीत उत्तीर्ण. हौशी नाट्यस्पर्धेत अभिनयाचे पारितोषिक.

**कु. मनीषा बोईन**

आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत तृतीय क्रमांक, निबंध स्पर्धेत द्वितीय क्रमांक, पारितोषिकाची रक्कम वर्धिनीस देगणी.

**दीपक धामापूरकर**

अभियांत्रिकी पदवी परीक्षेत पुणे विद्यापीठात प्रथम. सुवर्णपदक

**गणेश राऊत**

वृत्तपत्रविद्या पदविका परीक्षेत पुण्यात प्रथम

**किरण जिंतीकर**

कलाशाखेतील पदवी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण - रंग व आलेपन विषयातील पदविकेत प्रथम क्रमांक.



**यशसुखाची मीठमोहर मातृमुखी ओवाळूनी**
**मुक्त झाले जीवनी या, असती का ऐसे कुणी ?**

# हे वीर विवेकानंद



स्वामी विवेकानंदांच्या शिकागो येथील सर्वधर्म-परिषदेतील जगप्रसिद्ध भाषणाला यंदा शंभर वर्षे पूर्ण झाली. ११ सप्टेंबर १८९३ च्या दिग्विजयाचं हे शताब्दी वर्ष. यानिमित्त ठराविक साच्यातले कार्यक्रम करण्यापेक्षा स्वामी विवेकानंदाचे विचार पुण्यातील शालेय विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावेत असा संकल्प 'स्व'-रूपवर्धिनीने केला. किमान शंभर शाळांमध्ये कार्यक्रम करण्याचे उद्दीष्ट होते. कार्यक्रमाची आखणी करताना स्वामीजींचा शालेय विद्यार्थ्यांसाठीचा संदेश, देशभक्तीचा संदेश सर्वत्र पोहोचवावा हा मुख्य हेतू होता. त्याचबरोबर या कार्यक्रमात सर्व मुलांचा सहभाग असावा व त्यांचेही काही शिक्षण व्हावे असा प्रयत्न होता. त्याप्रमाणे आपल्या सर्व शाखांना त्यांचा परिसर व कार्यक्रमांचे लक्ष निश्चित करून दिले. मुलांच्या भाषणांची, गोष्टींची तयारी युवकांनी करून घेतली.

रामकृष्ण शाखा - जंगली महाराज रस्त्याच्या पूर्वेकडील भाग ते स्वारगेट, लष्कर असा परिसर, विवेकानंद शाखा - पाषाण, विद्यापीठ परिसर, शिवाजीनगर, डेक्कन जिमखाना, विधी महाविद्यालय असा परिसर, चंद्रशेखर आझाद उपशाखा - कोथरूड परिसर, अखंडानंद शाखा - मार्केटयार्ड, धनकवडी, बिबवेवाडी परिसर, सुबोधानंद शाखा - एरंडवणा, कर्वेनगर परिसर तसेच भगिनी निवेदिता शाखा - मुलींच्या शाळा अशी कामाची विभागणी करण्यात आली. अनुभव असा आहे की, काही अपवाद वगळता सर्व शाळांचा उत्तम प्रतिसाद या कार्यक्रमाला मिळाला. त्यातून या शाळांबरोबर असलेले 'स्व'-रूपवर्धिनीचे स्नेहबंध दृढ झाले.

**या निमित्ताने आपण एकूण साठ शाळांमध्ये शंभरच्यावर कार्यक्रम केले. पंचवीस हजार शालेय विद्यार्थ्यांपर्यंत आपण विवेकानंदांचे विचार पोहोचवू शकलो.** पंधरा-सोळा विद्यार्थ्यांपासून ते सुमारे तीन सहस्त्र विद्यार्थ्यांपुढे मुलांनी न घाबरता कार्यक्रम सादर केले. कार्यक्रमाचे संचालनही अनेक ठिकाणी मुलांनीच केले. आपल्याकडील अनेक मुले यानिमित्ताने प्रथमच व्यासपीठावर येऊन बोलली व चांगल्या पद्धतीने उत्तरोत्तर सुधारणा करत आत्मविश्वासाने विषय मांडू लागली. शाळेतल्या शिक्षकांनी या मुलांचे कौतुक केले व आमच्या शाळेत मुलांची अशा पद्धतीने तयारी करून घेऊ शकाल का? अशी विचारणाही केली. काही शाळांच्या समाजसेवेच्या

तासिकांचे नियोजन 'स्व'-रूपवर्धिनीच्या युवकांनी करावे, असेही विचारण्यात आले.

वर्धिनीच्या शक्तीचे दर्शन या कार्यक्रमातून निश्चितच जाणवले. परंतु त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे विवेकानंदांच्या विचारातील आशय वर्धकांच्या मनात चांगल्यापद्धतीने उतरला व त्यानुसार काही कृती करण्याची प्रेरणा त्यातून उभी राहिली.

**या कार्यक्रमानंतर झालेला शोधबोध हे त्याचे प्रातिनिधिक दर्शन आहे.**

## माझ्या मुलाने विवेकानंद व्हावे !

विवेकानंद शाखेतील एक वर्धक. घरी वडिलांचं छत्र नाही. आई काम करून जिद्दीने संसार चालविते. अशा या वर्धकाच्या घरी आपले युवक संपर्काला गेले. घरी वर्धिनीविषयी, विवेकानंदांच्या कार्यक्रमाविषयी माहिती दिली. त्यावेळी ही माऊली म्हणाली, "माझ्या मुलाला विवेकानंदांसारखं घडवा!" एक युवक म्हणाला, "आई, पण ते सोपं नाही. त्यासाठी त्याला कदाचित घरदार सोडून बाहेर पडावं लागेल!" त्यावर त्या माऊलीने दिलेलं उत्तर कायम स्मरणात राहण्यासारखं आहे. "माझा मुलगा विवेकानंद होऊन देशाची सेवा करणार असेल, तर त्यासारखा आनंद दुसरा कोणताही नाही. माझं घर चालविण्याची जबाबदारी मी सांभाळीन!"

खरेच! आजही या देशात अशा माता आहेत, तेव्हा विवेकानंद, शिवाजी येथे निर्माण होण्याची परंपरा निश्चितच कायम राहण्याची आशा आहे.

●●●

### ● आपण काहीच का करू शकणार नाही?

मी जेव्हा वर्धिनीत येत नव्हतो, तेव्हा मला विवेकानंदांसंबंधी अतिशय कमी माहिती होती. परंतु जेव्हा वर्धिनीत येऊ लागलो तेव्हा मला विवेकानंद हळूहळू कळू लागले.

विवेकानंदाचे विचार आपल्याला अनेक शाळांमध्ये मांडायचे आहेत, असे समजल्यावर मी प्रथम टाळाटाळ केली. आपल्याला मुलांपुढे न घाबरता न अडखळता बोलता येईल का? अशी भीती वाटत होती. पण नंतर जेव्हा युवकांनी यासंबंधी आम्हा सर्वांना आवाहन केले. तेव्हा ठरवले की बस्स... आपण हे करायचेच. मनात विचार आला की, स्वामीजींनी भारतीयांसाठी एवढे काम केले ते कोणता स्वार्थ पाहून? भारताची धर्मपताका विदेशात फडकावली ती कशासाठी? मग आपण काहीच का करू शकणार नाही?

### ● परिसरात कार्यक्रम व्हावेत

स्वामी विवेकानंदांचा मनाची एकाग्रता हा गुण माझ्या मनाला भिडला. तो माझ्या जीवनात उतरविण्याचा मी प्रयत्न करणार आहे. अभ्यासाच्यावेळी पुस्तकावर लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न करीन. खेळताना फक्त खेळातच लक्ष देईन. आपण हुशार कसे व्हावे, समाजात कसे वागावे हे मला विवेकानंदांचे पुस्तक वाचून कळले.

यापुढे आपण शाळांप्रमाणेच जवळपासच्या वस्तीत कार्यक्रम घ्यावेत. त्यामुळे स्वामी विवेकानंदांचे महत्त्व, त्यांचे आचार-विचार हे सर्वसामान्य जनतेला समजतील व आपण प्रगती कशी करावी याची सामान्य जनतेला जाण येईल.

### ● मी घाबरणार नाही

स्वामी विवेकानंदांचा 'कधीही, कोणत्याही प्रसंगी भिऊ नये' असा विचार मला सर्वाधिक

आवडला. कधीही भिऊ नये, इतरांना मदत करावी, भेदभाव करू नये, अशा स्वामीजींच्या जीवनातील गोष्टी मी कायम लक्षात ठेवीन. मी खेळताना कोणालाही घाबरणार नाही. मित्रांना व इतर कोणालाही मदत करीन.

**● आणखी तयारी हवी होती**

आमच्या कार्यक्रमाचा दर्जा चांगला होता, पण तो अजून चांगला करण्याच्या दृष्टीने मुलांनी अधिक तयारी करायला हवी होती. तसेच त्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण व्हायला हवा होता. त्यासाठी मी माझ्या भाषणाची तयारी अजून चांगली केली असती व लहान मुलांकडून मी स्वत:हून तयारी करून घेतली असती.

स्वामी विवेकानंदांचे एकाग्रता, सर्वांविषयी प्रेम व आपुलकी हे विचार हृदयाला जाऊन भिडले. त्यांच्या या विचारांमुळे मनुष्याला विचारांची दिशा मिळून तो आपल्याबरोबरच इतरांचेही हीत साधू शकतो. त्यांचे विचार मी अभ्यासातून, एखाद्या विषयावर विचार करण्यातून व दैनंदिन, नेहमीच्या व्यवहारातून उतरविण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

●●●

***जी जीवनपुष्पे सतेज नवरक्ताची***
***स्थापावा त्यांनी धर्म आत्म अर्पूनी***
***त्यानेच अर्चना होत राष्ट्रदेवाची***

## ● रूप पालटू देशाचे ●

गगन ठेंगणे चला करू या ।
उंच शिखरी ध्वजा धरू
अथक परिश्रमे स्वर्ग निर्मू या ।
अज्ञानाला दूर करू ।।धृ।।

शिक्षणातुनी संस्कार जागवू ।
राष्ट्रावरच्या भक्तीचे ।।
संपर्कातुनी करू निर्दालन ।
समाजघाती विषयांचे ।।
ज्ञानाचीया करू साधना ।
विज्ञानाची कास धरू ।।
विनम्रतेच्या विश्वासावर ।
सकलांचे आधार ठरू ।।१।।

यशही मिळवू किर्तीसंगे ।
दर्शन घडवू शक्तीचे ।।
समरसतेचा मंत्र जागवू ।
रूप पालटू देशाचे ।।
मानवतेच्या कल्याणाचे ।
स्वप्न इथे उमलावे ।।
विकसित होता फूल पूजेचे ।
अर्पित होऊनी जावे ।।२।।

●●●

हार्दिक शुभेच्छा!


**मे. रमणलाल ट्रेडिंग कंपनी**

*नारळ, मिरची व किराणा मालाचे दलाल*

१८० भवानी पेठ, पालखी विठोबा चौक,
पुणे ४११ ००२.

फोन : रेसि : ६५६९६८
ऑफिस : दुकान : ६५७९४७

# वर्धिनीची साथसंगत, गुणांची शिदोरी



*'स्व'-रूपवर्धिनीचं काम हे माणसं घडविण्याचं काम आहे. कळीचं रूपांतर फुलात जसं होतं तसं हे हळुवार घडणं. आपली भूमिका फक्त जपणाऱ्या माळ्याची. छोट्या छोट्या गोष्टीतून चांगली शिकवण देण्याचा हा प्रयत्न. मोठ्या शब्दात त्यांना संस्कार म्हणता येईल. नेहमीच्याच, साध्या सोप्या गोष्टी समजून घेऊन, प्रामाणिकपणे अधिक चांगल्या करणे ही गोष्ट महत्त्वाची आहे.*

*'स्व'-रूपवर्धिनीच्या प्रत्येक कामात असा प्रयत्न असतोच. परंतु* ***वर्धिनीत शिकून व्यवसायानिमित्त बाहेर गेलेल्यांना ही शिदोरी खचितच् उपयोगी पडते. या शिदोरीचं वेगळेपण प्रकट करणारी दोन वर्धकांची ही पत्रं —***

**गुरूवर्य श्री. पटवर्धन सरांच्या चरणी,**
**संजयचा सा. न. वि. वि.**

आपले आश्चर्यचकीत करणारे पत्र मिळाले. सोबत आनंदाश्रुदेखील आले. वाचताच भूतकाळ एखाद्या चित्रपटाप्रमाणे डोळ्यासमोरून सरकला. अनेक मित्रमंडळींचे चेहरे आठवले. अनेक शिबिरे आठवली; अभ्यासवर्ग आठवले, स्वरूपवर्धिनीस भेट देण्याकरीता आलेल्या प्रसिद्ध व्यक्ती आठवल्या. पुन्हा एकदा बालपण आठवले. तो एक सुखद, आनंददायी आणि मनाला उल्हासित करणारा काळ मला लाभला. त्याबद्दल मी आपला ऋणी आहे.

मला आता येथे येऊन दोन वर्षे झाली. इथल्या स्पर्धात्मक जगासोबत स्वत:ला बरोबरीने नेण्यास सुरूवातीस खूप कष्ट पडले. अनेक अडथळे आले. त्या सर्वांवर मात करण्यास आपले आशीर्वाद व आपण दिलेली शिकवणूक उपयोगी पडली.

इथे येताच मला पहिल्या प्रथम जर कुठल्या गोष्टीचा उपयोग झाला असेल तो म्हणजे वर्धिनीत आम्हाला सांगितले होते की, हातात इंग्रजी वर्तमान पत्रातील कमीत कमी मुख्य वार्ता (हेडलाईन्स्) अर्थ समजावून घेऊन वाचणे. मी त्याप्रमाणे वागलो. माझा शब्दसंग्रह वाढला. मराठी माध्यमात शिकूनदेखील योग्य प्रकारे इथल्या सर्व थरातील लोकांशी, सर्व देशातील लोकांशी माझा संबंध येतो पण त्यांच्याशी मी व्यवस्थित बोलू शकतो ते केवळ वर्तमानपत्र वाचण्याच्या जोरावर. अनेक भारतीय तरूण इथे ह्या कारणास्तव झगडताना मी पाहिले.

वर्धिनीत अनेक व्याख्याने ऐकली. काहींचे विचार पटले. काहींचे पटले नाहीत. सर्व व्याख्यानातून मी घेतलेल्या गोष्टी म्हणजे प्रामाणिकपणा, इमानदारी, अखेर सत्याचाच विजय होतो. इथे अरबी देशात हे लोक फार संशयी आहेत. स्वत:च्या मुलांवर देखील हे लोक विश्वास ठेवत नाहीत. विश्वासघातक्यास ते जिवंत सोडत नाहीत. वर्धिनीमुळे माझ्या अंगी चांगुलपणाचे जे गुण रूजले. त्यांचा खरोखरच इथे उपयोग झाला. मला भेटलेला माझा बॉस (अधिकारी) देखील अशीच संशयी व्यक्ती. त्याने अनेक प्रकारे माझ्या प्रामाणिकपणाची परीक्षा घेतली. सर्व परीक्षा मी उत्तीर्ण झालो. विश्वास

बसला. आता मी त्यांच्या एका संबंध सुपरमार्केटचा अधिकारी आहे. आज जी काही प्रगती मी केली आहे ते वर्धिनीचे विचार अंगी रूजल्यामुळे. इथे आलेले अनुभव खरोखरीच अंगावर काटा उभे करण्याजोगे आहेत. मी कितीही ह्या कागदावर उतरवयाचा प्रयत्न केला तरी ते माझ्याकडून जमणे नाही.

इराक व संयुक्त राष्ट्राचे युद्ध हा मनाचा थरकाप उडविणारा अनुभव होता. युद्धकाळात अनेक लोक जीवाच्या भीतीने येथून परतले. पण माझ्या अंगी धैर्य आले. त्या अनेक साहसाच्या, धैर्याच्या गोष्टी सरांच्या व इतर अनेक वक्ते मंडळींच्या व्याख्यानात ऐकून. युद्धकाळात जे काही दोन-तीन दिवस सुट्टी मिळाली तेव्हा मी दोन-चार चित्रे रेखाटली. युद्धाचे भयंकर परिणाम पाहून अनेक जीव तडफडताना पाहून; अनेक महिला, मुले जीवाच्या आकांताने रडताना पाहून माझा अहिंसेवरचा विश्वास गाढा झाला. म. गांधींचे विचार पटले. मग हातातल्या पेन्सिलने महात्माजींचे चित्र रेखाटले तेच आपल्या चरणी ह्या पत्रासोबत पाठवितो. आशा व्यक्त करतो आपण ते स्वींकाराल व आपल्याला ते नक्कीच आवडेल.

पत्राचा शेवट करताना 'स्व'-रूपवर्धिनीतील वर्धकांना एकच सांगणे. मित्रांनो! वर्धिनीची शिकवणूक, विचार आत्मसात करा. ते तुमच्या भावी आयुष्यात नक्कीच कामाला येतील.

लवकरच मला वर्धिनीचा अहवाल मिळेल अशी आशा करतो. अहवाल जर इंग्रजीमध्ये असेल तर उत्तम. इथल्या लोकांना दाखवून वर्धिनीस मदत गोळा करण्याचा प्रयत्न करावा म्हणतो.

सर्व थोर मंडळींस नमस्कार.

आपला,

**संजय,** बहारिन

**श्री. पटवर्धन सर यांसी,**

**सा. न. वि. वि.**

मला वर्धिनीत, घरात, घराबाहेर आलेले अनुभव मी कधीही विसरू शकणार नाही. वर्धिनीचा फायदा बारामतीत आल्यावर कसा झाला किंवा यापुढे कसा होणार आहे हेच फक्त लिहीत आहे.

'स्व'-रूपवर्धिनीचा फायदा, वर्धिनीतून बाहेर गेल्यावर कळतो, हे एक सत्य, मला बारामतीत अनुभवाला आहे. विद्यार्थ्यांच्या घरी संपर्क, वस्तीतले तास, संध्याकाळच्या तासिका इ. आग्रहाचा फायदा जीवनात काय आहे हे आज समजते. संपर्क कसा करावा. त्याची तथ्ये व पथ्ये, मित्र कसे मिळवावेत, ते कसे टिकवावेत, समोरच्याला आपलेसे कसे करावे या गोष्टी मी वर्धिनीत शिकलो नसतो तर जीवनात अभियंता होऊन काही फायदा नाही हेच जाणवले असते.

मित्र ही एक जगातील संपत्ती आहे. केवळ मित्रांच्या सहवासामुळे चांगल्या मार्गावर गेलेली आणि मित्रांच्या संगतीमुळे अयोग्य मार्गावर गेलेली माणसे आज समाजात आढळतात. आजच्या, सभोवतालच्या स्वार्थी जगात चांगले मित्र मिळणे हेदेखील नशीबच असते. योग्य चांगले मित्र मला वर्धिनीत मिळाले, हा एक फार मोठा फायदा मला वर्धिनीचा झाला.

समाजात निरनिराळ्या स्वभावाची माणसे असतात. अशा विभिन्न स्वभावाच्या माणसांना आपलेसे कसे करून घ्यावे ही एक जीवनातली महत्त्वाची कला आहे. समोरच्या माणसाचा स्वभाव ओळखणे, त्याच्याशी त्या पद्धतीने वागणे, त्याचेही शिक्षण वर्धिनीत निरनिराळ्या वर्धकात वावरताना मिळाले.

श्री. कन्हैयालाल बलदोटा यांची खोली तर मला माझ्या जीवनात फार महत्त्वाची वाटते. ह्या खोलीवर मी व दीपक केवळ अभ्यासच न करता निरनिराळ्या

विषयांवर गप्पा मारत असायचो. अशा गप्पांतूनच स्वतंत्रपणे विचार करून पावले टाकणे शिकलो. अनेकदा ठेचकाळलो पण पुन्हा सावरलो. वाहत्या पाण्याबरोबर वाहत न जाता, आजच्या कृतीचा विचार करण्याची संधी खोलीतील शांततेने दिली. आजही एखादी अडचण किंवा संकट आले की मी सर्वप्रथम शांतता असणाऱ्या जागेत जाऊन विचार करतो. असे विचार करताना काही सुविचार मी डोळ्यासमोर ठेवतो.

'एक एक पाऊल टाकीत चाल निश्चयाने
नको बावरूनी जाऊ, नियतीच्या भयाने'

कष्टाचा आवाज हा शब्दाच्या आवाजापेक्षा मोठा असतो.

"Tough time never last, tough people will do."

अशा सुविचारांचा मला खूपच फायदा होतो.

बाकी सर्व ठीक आहे. आपली व बाईंची तब्येत कशी आहे. जास्त त्रास घेऊन काम करण्यापेक्षा कासवाची संथ गती योग्य असे मला वाटते.

आपला विद्यार्थी,
**चैतन्य**

●●●

## दहावी अभ्यास शिबिर - १९९२

दहावीचे वर्ष जीवनातील एक महत्त्वाचे वर्ष. यावर्षीची दिवाळी वर्धिनीतील दहावीच्या विद्यार्थ्यांनी शिबिरात एकत्र येऊन, अभ्यासाची आरास मांडून साजरी केली. दि. २० ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर असे २२ दिवसांचे अभ्यास शिबिर योजनाबद्ध वातावरणात 'स्व'-रूपवर्धिनीच्या वास्तूत पार पडले. वर्षभराच्या अभ्यासक्रमाची तासिकांद्वारे पूर्तता, भाषा-व्याकरणासाठी विशेष मार्गदर्शन, परीक्षांचा सराव व प्रेरणाजागृतीची सत्रे ही शिबिराची काही ठळक वैशिष्ट्ये होत.

पुण्याच्या तीन शाखांवरून तीस विद्यार्थी या शिबिरात सहभागी झाले; तसेच साताऱ्याच्या 'स्व'-रूप-साधना संस्थेचे, बीड जिल्ह्यातील डोमरी गावच्या गुरूकुलाचे व संभाजीनगरच्या देवगीरी शाखेचे विद्यार्थी शिबिरासाठी पुण्यात दाखल झाले होते.

बावीस दिवस बाहेर फटाक्यांची तर इथे शिबिरस्थानी मात्र तासिकांची, परीक्षांची व प्रश्नोत्तरांची आतषबाजी चालू होती. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत अखंडपणे ज्ञानोपासना चालू होती. शिबिरात वर्धिनीच्या ज्येष्ठ शिक्षकांनी १२२ तासिकांमधून वर्षभराचा सर्व अभ्यासक्रम जवळजवळ पूर्ण केला. रोज संध्याकाळी वर्धिनीचे मार्गदर्शक व ज्येष्ठ कार्यकर्ते यांची मनोगते प्रेरणासत्राद्वारे विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आली. ज्यातून शिक्षणाचे अंतिम उद्दीष्ट व जीवनातील कर्तव्यशिखरांचे विद्यार्थ्यांना दर्शन घडले.

कमलताई टाककर यांनी आईच्या मायेने सर्व दिवस अत्यंत परिश्रम घेऊन या मुलांसाठी स्वतः स्वयंपाक केला. एवढेच नव्हे तर भोजनाच्या वेळी उपस्थित राहून आपल्या गोड शब्दांनी विद्यार्थ्यांची स्नेहाची भूकसुद्धा भागविण्याचा प्रयत्न केला. वर्धिनीचे मातृस्वरूप कमलताईंच्या रूपाने पाहावयास मिळाले.

सणाचे चार दिवस पुण्यातील शिबिरार्थींनी बाहेरगावच्या भावंडांना अगत्याने आपापल्या घरी राहावयास नेले. ते चार दिवस प्रत्येक घरात इतके स्नेहपूर्ण होते की आपण आपल्या घरांपासून दूर आहोत हा विचारही बाहेरगावच्या शिबिरार्थींच्या मनात आला नाही. एका पालकांनी तर सगळ्यांबरोबर या पाहुण्यासाठीसुद्धा दिवाळीचे कपडे तयार करविले व प्रेमाने त्यास ते दिले.

असे कितीतरी प्रसंग या २२ दिवसांच्या शिबिरात अनुभवास आले.

●●●

# अखंडानंद शाखा

'स्व' -रूपवर्धिनीची शाखा बिबवेवाडीला सुरू होऊन यंदा सात वर्षे पूर्ण झाली. स्वामी विवेकानंदांचे गुरुबंधु अखंडानंद यांच्या नावाने ही शाखा ओळखली जाते. त्यांनी आयुष्यभर केलेल्या निस्वार्थ सेवेची प्रेरणा आमच्या डोळ्यांसमोर राहाणे जरूर आहे. या शाखेतच वाढलेले दहा - बारा युवक आज ही जबाबदारी समर्थपणे सांभाळतात. वर्धकांची संख्या आता पंचेचाळीस आहे. या पार्श्वभूमीवर गेल्या वर्षभरात झालेल्या कामाचा अनुभव आनंददायी, विश्वास वाढविणारा आहे.

दिवाळीच्या पहिल्या दिवशी फराळाचा पहिला गोड घास आपल्या समाजबांधवांसमवेत घेण्याचा आग्रह असतो. 'निवारा' सारखे वृद्धाश्रम, अंधशाळा, कुष्ठधाम, अशा ठिकाणी मुले आवर्जुन जातात; आपुलकीच्या माध्यमातून संवाद प्रस्थापित करतात. यातून मुलांचेही नकळत शिक्षण होते. आपल्या परिसरातील वडिलधाऱ्या वृद्ध व्यक्तींशी कसे बोलावे, कसे वागावे याची जाण येते. कुष्ठधामातील एखाद्या ताईला कोपऱ्यापर्यंत दोन्ही हात नसून, ती स्वयंपाकाची सर्व कामे करते, ते पाहून काही मुलांना तरी, आपण धडधाकट असूनही सगळी कामे करत नाही, याची जाणीव होते. स्वावलंबनाचा धडा मिळतो.

**संपर्कातील अनुभव :**

संपर्क - हा आपल्या कामातला प्राण. केवळ विद्यार्थ्यांपर्यंत संपर्क मर्यादित न राहता त्याचे सर्व घरच आपलेसे होते. एका मोठ्या कुटुंबाचे आपण घटक होतो. एखाद्या घरी आठ-दहा दिवसात जाणं झालं नाही, तर प्रेमाचे रागावणेसुद्धा सहन करावे लागते. यातील काही अनुभव सांगण्यासारखे आहेत.

आपल्याकडे येणाऱ्या वर्धकाचा एक छोटा भाऊ दुसऱ्या इयत्तेत होता. पण मोठा भाऊ शाखेत काय करतो याची उत्सुकता त्यामुळे शाखा पाहायला मैदानावर आला. दीड-दोन वर्षे नुसता शाखेत येऊन बसायचा; खेळ पाहायचा. 'अरे, तू मोठा झाल्यावर शाखेत ये.' असे बऱ्याचदा सांगूनही त्याचे येणं काही कमी झालं नाही. पुढे तो शाखेत नियमित येऊ लागला. मोठा भाऊ शाखेत असल्याने त्याच्या घरातील वागणुकीसंबंधी शाखेत तक्रारी येऊ लागल्या. शाखेतील युवकांनी त्याला समजावले. घरच्या वागणुकीत बदल झाला असून आज तो मुलगा म्हणतो, **'मी रागावलो किंवा चुकून उलट बोललो तर मला शिक्षकांचे प्रेमळ शब्द आठवतात व राग क्षणार्धात पळून जातो.'**

वाढदिवसाच्या दिवशी एका वर्धकाच्या घरी गेलो. यानिमित्ताने काही चांगला संकल्प करण्याचा आपला आग्रह. या वर्धकाचे बोल कायमचे लक्षात राहाण्यासारखे आहेत. तो म्हणाला, **'इतके दिवस सगळे शिक्षक चांगलं काम करतात हे ऐकत होतो. पण ते नेमकं काय करतात ते कळत नव्हतं. आता हळूहळू समजायला लागलं आहे. त्यामुळे आता मीसुद्धा जे काही करीन ते शाखेसाठीच.'** अवघं बारा-तेरा वर्षांचं वय आणि हेच काम करण्याचा संकल्प! ही प्रेरणा इथे सहजपणे उभी राहाते व असे प्रसंगही काम करणाऱ्यांना उभारी मिळवून देतात.

आपल्या संपर्काचा परिसस्पर्श बिबवेवाडी परिसरातही आता वाढतो आहे. यंदाच्या वर्षी गावातील शिवजयंती उत्सवासाठी आपले पथक देण्याचे ठरले. परंतु त्यांचाही सहभाग वाढावा यासाठी त्या मंडळातील तरुणांचे एक ध्वजपथक आपण उभे केले. तेथील कार्यकर्त्यांशी जवळकीचे संबंध निर्माण झाले त्यामुळे अडीअडचणीला तेही आपल्या बरोबर उभे राहाण्याचे विश्वास उत्पन्न झाला आहे. परिसरात कामाचा प्रभाव जाणवण्याइतपत वाढला आहे. वर्धक- त्याचे कुटुंब व परिसर या साखळीतून 'स्व'चे वर्धन करण्याचे काम आकार घेत आहे.

**अखंडानंद शाखेतील वर्धकांना शाखेबद्दल काय वाटते - त्याचे हे प्रातिनिधिक स्वरूप. हे संपूर्ण नाही परंतु पुरेसे बोलके आहे.**

इयत्ता सहावीतील एक वर्धक शाखेत येऊन जेमतेम वर्ष झालेलं. परंतु सुट्टीत गावाकडे गेला. तेथे आपल्या वयाच्या दहा-पंधरा जणांना एकत्र करून त्यांची शाखा घेतली. त्यांना खेळ, गाणी, गोष्टी शिकविण्याचा प्रयत्न केला. त्याचे हे मनोगत —

'मित्रांनो, शाखा म्हणजे काय? व त्याचे ऋण कसे फेडावे? हे दोन प्रश्न मला पडले आहेत. शाखेत येण्याआधी मी संपूर्ण दिवस खेळ, टी.व्ही. पाहाण्यात घालवायचो. अभ्यासाचा कंटाळा यायचा. आमच्या शाळेत मुलांची नावे घेण्यासाठी शिक्षक आले तेव्हापासून मी शाखेत यायला लागलो. खेळ व गाणी यांची माहिती झाली. आमच्या शाखेतील सर्व शिक्षक व दिदी आमच्यावर प्रेम करतात, आम्हाला चांगले वागायला शिकवतात.

जर मी शाखेत आलो नसतो तर माझ्या आयुष्याचे नुकसान झाले असते. आणि मग मी तुम्हाला आता आहे तसा चांगला दिसलो नसतो. मग मी शाखेचे ऋण फेडू शकलो नसतो. मी मोठा होऊन लहान - लहान मुलांना शिकवून त्यांनाही आपल्यासारखे बनवले तरच शाखेचे ऋण फेडतील.'

**अभिमानाची गोष्ट**

एका सातवीतील मुलाचे हे मनोगत -

"आईवडिलांच्या पाया पडणे ही मोठ्या अभिमानाची घटना शाखेमुळे मला लाभली. त्यामुळे आईवडिलांना मोठा अभिमान वाटे की माझा छोटासा मुलगा व त्याला कळते. नवीन जगाचा अनुभव नसलेला हा छोटा चिमुकला मुलगा, नवीन जगाचा अनुभव घेणार यात त्याला जी अडचण येईल त्यावेळी आम्ही त्याच्या पाठीशी उभे राहू असे त्यांच्या मनात वाटत होते.

शाखेमुळे माझ्या जीवनातील प्रत्येक अशक्य गोष्ट शक्य होऊ लागली. बोलण्यात बदल झाला शाळेच्या टक्केवारीत व अभ्यासात बदल झाला. अशा तऱ्हेने प्रत्येक गोष्ट शक्य होत होती.

मी घडलो, माझ्या शाखेमुळे. त्याला रंग दिला म्हणजे प्रोत्साहन आई-वडिलांनी दिले. नवीनच रंग व नवीनच युक्ती यामुळे माझ्या शरीरातील कणाकणात वाढ झाली. आता मी परीपूर्ण झालो आहे."

कदाचित त्याला यातील शब्दांचा अर्थसुद्धा पुरेसा माहिति नसेल, परंतु त्यातील भावना मात्र लाखमोलाची आहे.

•••

***साधने घडविणे, ती अचूक, समर्थ करणे हे महत्त्वाचे असते. साधने जर योग्य असतील तर साध्य सिद्ध होणारच. कारणांमुळे परिणाम घडतो हे आपण विसरतो.***

*— स्वामी विवेकानंद*

## सामर्थ्याची उपासना

समर्थ रामदास उपशाखेचा दुसरा वर्धापन दिन दि. १६ जानेवारी रोजी झाला. या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व कार्यवाही शाखेतील आठवी-नववीच्या वर्धकांनी केली. संपूर्ण कार्यक्रम सुव्यवस्थित व उत्साहात झाला. केवळ दोन वर्षाच्या थोड्या काळात या मुलांनी केलेली प्रगती व आपलेपणाने एकत्र येऊन काम करण्याची वृत्ती ही आनंदाची गोष्ट आहे. शाखेसाठी ही वाढदिवसाची एक प्रकारची भेटच आहे.

दोन वर्षांपूर्वी अत्यंत सहजपणे सुरू झालेली ही शाखा झपाट्याने वाढली. निवडचाचणी न घेता परिसरातील विद्यार्थ्यांसाठी खुली असलेली ही शाखा. मात्र मुलांची पुढे जाण्याची धडपड, नियमितपणा, प्रामाणिकपणा हे निकष जरूर आहेत. अनेक मुलांच्या घरची परिस्थिती बेताची आहे. त्यामुळे सुट्टीच्या काळात आपल्या शिक्षणाचा खर्च भागविण्यासाठी काही ना काही काम करावे लागते. तरीसुद्धा दिवसभर काम करून आल्यावर न थकता, न कंटाळता उत्साहाने शाखेवर उपस्थित असतात. या ओढीमुळेच काही चांगले बदल घरच्यांना व वर्धिनीतील कार्यकर्त्यांना जाणवू लागले आहेत. मुलांमधील सुप्त गुण हळूहळू फुलू लागले आहेत. या शाखेतील काही मुलांनी या वर्षी पोस्टकार्डावर स्वत: अत्यंत चांगली चित्रे काढून दिवाळी भेटकार्डे तयार केली. ती अनेक हितचिंतकांना पाठविण्यात आली.

शाखेत आयत्या वेळचे विषय देऊन काही वक्तृत्वस्पर्धा आयोजित केल्या. थोड्या वेळात तयारी करून काही मुले पहिल्यांदाच न घाबरता चांगलं बोलली. पण एवढ्यावरच समाधान न मानता त्यांना अधिक चांगले कसं बोलता येईल याचा प्रयत्न सुरू आहे.

शाखेची यंदा सिंहगडला सहल नेली. रात्रीच्या चांदण्यात गड चढण्याची स्पर्धा ठेवली. पाचवी-सहावीतील लहान मुले गड चढतील का नाही अशी शंका होती. परंतु पाचवीतला एक वर्धक सर्वांत प्रथम गडावर पोहोचला.

दि. १४ एप्रिलला आंबेडकर जयंतीच्या दिवशी मुलांनी परिसरात संपर्क साधून स्वत:च्या प्रयत्नाने तीस ते पस्तीस रक्तदाते मिळविले. रक्तदानाचे महत्त्व पटवून देऊन आठ-दहा जणांना एकाने रक्तदानासाठी आणले. शाखेत त्याचे कौतुक करण्याचे कळल्यावर तो म्हणाला, "मी हे बक्षिसासाठी किंवा कौतुकासाठी केले नाही तर शाखेसाठी केले" या वयात ही समज येणे हा खरा वर्धिनीच्या यशाचा मानक आहे.

•••

**● असाही सहभाग हवा आहे ●**

*१) आपल्या मित्रांना या संस्थेची माहिती सांगू शकता.*
*२) सहज जाता जाता हितचिंतकांबरोबर संस्थेतील प्रकल्प पाहायला येऊ शकता.*
*३) दिवसातला काही वेळ संस्थेसाठी खर्च करू शकता.*
*४) स्वत: नाही तरी हस्ते-परहस्ते आर्थिक सहाय्य करू शकता.*
*५) आपल्याकडील अनुभवांचा फायदा आम्हाला देऊ शकता.*

*With Best Complimnents From :*

**M/S. ELECTROMARK ASSOCIATES**

42 Electronic Estate
Pune - Satara Road,
Pune 411 009.

# स्वप्नपूर्तीच्या वाटेवर ..... भगिनी निवेदिता शाखा

स्वामी विवेकानंदांच्या विचारांनी व त्यांच्या उत्कट देशभक्तीने प्रेरित होऊन कु. मार्गारेट नोबल इंग्लंडहून भारतात आल्या. येथील गोरगरीबांसाठी स्त्रियांच्या कल्याणासाठी आयुष्यभर झटल्या. भारतीयांसाठी त्या भगिनी निवेदिता झाल्या. पण त्यांचं स्वप्न अजूनही अपुरंच आहे. ते पूर्ण करण्यासाठी या देशातच हजारो-हजारोंच्या संख्येने निवेदिता निर्माण व्हायला हव्यात. आपल्या अल्पशक्तीनुसार का होईना या स्वप्नपूर्तीच्या वाटेवर चालण्याचा प्रयत्न पाच वर्षांपूर्वी सुरू झाला. भगिनी निवेदिता शाखेच्या माध्यमातून गेल्या वर्षभरात या दिशेने झालेल्या प्रवासाचे हे कथन. वाटचाल अजून खूप आहे. परंतु योग्य दिशेकडे तोंड असल्याचं समाधान जरूर आहे.



दि. १ जूनला शाखेचा पाचवा वर्धापनदिन. या दिवशी केबल आणि स्टार टी. व्ही. च्या दुष्परिणामांसंबंधी मुलींनी काही पथनाट्ये सादर केली. किमान वाईट पाहणार नाही, सहन करणार नाही, असा छोटासा संकल्प केला.

यंदाच्या गणेशोत्सवात मुलींनी वेगळ्या पद्धतीने सहभाग घेतला. साक्षरता, हुंडाबळी, सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य, तुमच्या-आमच्या समस्या या विषयांवर मुलींच्या व युवतींच्या गटांनी पथनाट्ये सादर केली. आपल्या भागातील अनेक गणेशमंडळांचा त्याला चांगला प्रतिसाद लाभला.

या वर्षी शाखेत एक नवीन उपक्रम सुरू केला. दर सोमवारी मुलींच्या वेगवेगळ्या विषयांवर कथाकथनस्पर्धा घेण्यात आल्या. त्यामुळे मुलींचा सभाधीटपणा वाढला व एखाद्या विषयावर माहिती गोळा करून ती संगतवार मांडण्याची सवय लागली. त्याचा शाळेच्या अभ्यासातही चांगला उपयोग होतो. काही नाट्यस्पर्धासुद्धा घेण्यात आल्या. साक्षरता या विषयावर ८वी/९वीच्या मुलींनी सादर केलेले 'सरणार कधी तम!' हे नाटक विचारप्रवृत्त करणारे होते.

**बनो शुद्ध बुद्धीही तेजस्विनी**

मुलींनी स्वतंत्रपणे विचार करावा व त्यासाठी त्यांना चांगल्या वाचनाची सवय व्हावी या दृष्टीने मानसिक विकास बैठकीचा खूप चांगला उपयोग होतो. 'तेजस्विता' हा जीवनमूल्ये पुस्तकातील भाग, शतपैलू सावरकर, डायरी ऑफ ॲन फ्रँक, आयडा स्कडरचे चरित्र, योगी अरविंद, सरदार भगतसिंह, इत्यादि चांगल्या पुस्तकांचे वाचन या वर्षात झाले. तसेच गंगा-कावेरी- प्रकल्प, राळेगणसिद्धी, आसामचा

प्रश्न, चंद्रावर मानवाचे पहिले पाऊल, इत्यादि विषयांवर व्याख्याने झाली.

ज्ञानेश्वर माऊलींची पालखी दरवर्षी पुण्यात येते. या पालखी सोहळ्यात यंदा निवेदिता शाखेच्या चाळीस मुलींची ध्वजदिंडी सहभागी झाली. ज्ञानेश्वरपादुका चौक ते सोन्या मारूती चौक या मार्गात मुलींचे पथक सहभागी झाले. ही पहिलीच वेळ असूनही चांगल्या सादरीकरणामुळे ही ध्वजदिंडी अनेकांना आवडली.

मुलींचे उन्हाळी शिबिर यावर्षी चंद्रशेखर आगाशे महाविद्यालयात झाले. 'खेळाच्या माध्यमातून विकास' हा शिबिराचा विषय होता. एकाग्रता, मानसिक समतोल, सावधपणा, कल्पकता, स्पर्धेची ईर्ष्या, इत्यादी गुणांची जोपासना खेळातून होऊ शकते. या दृष्टीने कबड्डी, खोखो या खेळांचे तंत्रशुद्ध प्रशिक्षण या शिबिरात मिळाले. याबरोबरच प्रतिभा विकसन, व्यवस्थापनाचे वैचारिक खेळही शिकविले गेले. खेळ या विषयावर व्याख्याने, चित्रपट याद्वारे अनेक तज्ज्ञांचे मार्गदर्शन शिबिरासाठी मिळाले.

हिवाळी शिबिर पुणे विद्यापीठात झाले. 'भूगोल' हा शिबिराचा विषय होता. व्याख्यानां-बरोबरच, काही ठिकाणांना प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करण्याचा कार्यक्रम आखला होता. राळेगण सिद्धी येथील पाणी अडवा, पाणी जिरवा, निघोज येथील रांजणखळगे, लवणस्तंभ, डेक्कन महाविद्यालयातील पुरातत्व विभागाचे काम, केंद्रीय जलसंशोधन विभागाचे काम मुलींनी स्वत: पाहिले. 'भूकंप' या विषयावरची चित्रफीत व व्याख्यानही मुलींना आवडले. भूगोलासारखा विषय चांगल्या, रंजक पद्धतीने शिकता येतो याचा सुखद अनुभव मिळाला.

शाखेवर वर्षभर सातत्याने चांगले कार्यक्रम झाले. त्यातून मुलींची जडणघडण निश्चितपणे होत असते, त्याचे प्रत्यंतर वेळोवेळी येते. पण त्या सर्वांहूनही महत्त्वाचे म्हणजे शिकण्याच्या प्रक्रियेत अनुकरणाचा मोठा वाटा असतो. शाखेवर काम करणाऱ्या ताईंचा (युवतींचा) गट किती उत्साहाने, आपुलकीने व नियोजनाने काम करतो, हे मुली पाहात असतात. त्याचा परिणाम अधिक चांगला, अधिक खोलवर असतो. गेल्या वर्षभरात शाखेचा भार समर्थपणे सांभाळणारा समंजस, सुविचारी व एकसंघ असा युवतींचा गट शाखेवर उभा राहिला आहे, ही सर्वात मोठी उपलब्धी आहे.

•••

## आम्ही बनू अभिमन्यू !

*इयत्ता नववीतील एक वर्धक शाळेच्या मधल्या सुट्टीत घरी येत होता. उशीर झाल्याने सायकलवर जरा घाईतच चालला होता. वाटेत समोरून एक बस भरधाव वेगाने पुढे येत होती. रस्त्यालगतची प्राथमिक शाळा नुकतीच सुटली होती. आपल्या पालकांचा हात निसटून एक छोटा मुलगा रस्त्यावरच थबकला. बस! काही क्षणांचाच अवकाश की तेथे एक भीषण अपघात झाला असता. परंतु त्याने क्षणाचाही विचार न करता स्वत:चा जीव धोक्यात घातला. बसला सायकलसह आडवे जाऊन त्याने त्या मुलाला बाजूला ढकलले. सायकलचे नुकसान झाले. परंतु सुदैवाने दोन्ही जीव सुरक्षित राहिले.*

*त्या मुलाच्या पालकांनी सुटकेचा निश्वास सोडला. वर्धकाचे आभार कसे मानावेत हे त्यांना कळेना. त्याला घरी येण्याची विनंती त्यांनी केली. शाळेत परत जायला उशीर होईल, म्हणून त्याने नाही म्हटले. पालकांनी आपल्याजवळचे नोटांचे पुडके काढून वर्धकाला पैसे देऊ केले. परंतु त्याने तेही नम्रपणे नाकारले. शेवटी सायकल दुरुस्तीच्या खर्चाचे पैसे पालकांनी त्याच्या खिशात जबरदस्तीने कोंबले. वर्धक शांतपणे पुन्हा शाळेच्या दिशेने निघाला.* ••

# स्वामी सुबोधानंद शाखा

चांगल्या कार्याचा विस्तार ही वर्तमानातील एक महत्त्वाची आवश्यकता आहे. वर्धिनीच्या शाखाविस्तार धोरणामागेही विधायक अशा सामाजिक अपेक्षांची पूर्तता हाच विचार आहे.

अध:पतीत प्रचार माध्यमे आणि त्यामुळे निकृष्ट नीतीमुल्यांची शिकार झालेला समाज, दुर्मिळ झालेली राष्ट्रनिष्ठा, संकुचित आणि व्यथाग्रस्त कुटूंबप्रवाह, नैराश्यमय विद्यार्थीजगत् या साऱ्या परिस्थितीवर शाखांमुळे काय परिणाम होणार?

परिणाम अवश्य होणार!

कारण अशा विपरीत परिस्थितीवर मात करायला शिकविणाऱ्या कार्यशाळा म्हणजेच 'स्व'-रूपवर्धिनीच्या शाखा होत.

*शाखांचा विस्तार म्हणजेच प्रगतीशील अशा राष्ट्रीय विचारांचा विस्तार! शाखांची संस्थापना म्हणजेच चिरमांगल्यमय अशा चेतनामंदिराची संस्थापना! शाखांवरील विचार म्हणजेच परिपूर्णतेच्या ध्यासाने भारलेले विचार! शाखांवरील कार्यक्रम म्हणजेच शक्तिजागरणाचे, वर्धिष्णू क्षमतांचे कार्यक्रम! शाखेच्या मैदानावरील समता म्हणजेच, खऱ्या अर्थी जातपातरहित, व केवळ बंधुत्वमय विश्व निर्मिणारी समता!*

*शाखेवरील अनुशासन म्हणजेच आखीव रेखीव, शिस्तबद्ध आणि समयबद्ध अशा भारताची रचना कल्पिणारे अनुशासन!*

*शाखेमधील संस्कार म्हणजे मर्यादापुरुषोत्तम राजा रामचंद्रासारखी व्यक्तित्वे घडविण्याची क्षमता असलेले संस्कार!*

*शाखेवरील आचार म्हणजेच स्वदेश, स्वभाव, स्ववेष, स्वराज्य, संस्कृती आणि स्वत्त्व यांचा अभिमान अंगी बाणविणारे आचार!*

वरील सर्व विचारांचे सत्यत्व प्रत्यक्ष अनुभवले तर शाखांचा विस्तार हाच सर्व सामाजिक समस्यांवर रामबाण उपाय आहे याची खात्री पटल्याशिवाय राहाणार नाही.

दि. २८ जुलै ९३ या दिवशी वर्धिनीच्या आणखी एका शाखेची सुरुवात नवसह्याद्री वसाहतीतील ज्ञानदा प्रशालेत झाली. स्वामी विवेकानंद, स्वामी अखंडानंद या आपल्या बंधुशाखांच्या परंपरांचा पाईक होण्याची आकांक्षा बाळगून 'स्वामी सुबोधानंद' शाखा असे नूतन शाखेचे नामकरण करण्यात आले.

वयाची सत्तरी ओलांडली तरी जिद्दीने शाखाकार्य सांभाळणारे वसंतराव दाते सर दादोजी कोंडदेवांच्या आवेशात या नूतन शाखेच्या बांधणीत कार्यरत झाले. शाखेच्या विविध व्यवस्थांचा पदभार सांभाळण्यासाठी आदिमाता चतु:श्रृंगीच्या परिसरातील विवेकानंद शाखेचे तीन युवक आणि शनिवारवाड्याच्या बुरुजाजवळील रामकृष्ण शाखेतील तीन नवयुवकांची शाखेवर नेमणूक करण्यात आली. साताऱ्याचे नारायण शिक्षकही कालांतराने या मेळाव्यात सामील झाले. सर्वजण धडाक्यात कामाला लागले. ज्ञानदा प्रशालेचे कार्यवाह श्री. अळवणी, मुख्याध्यापिका सौ. नलावडे बाई व शाळेतील शिक्षक श्री. सबनीस व श्री. शिंदे यांचे कृतिशील सहकार्य शाखा सुरू होण्यापूर्वीपासून अखंडपणे मिळत आहे.

इ. ५ वी ते ७ वी इयत्तेत शिकणाऱ्या ३५ चुणचुणीत, पाणीदार विद्यार्थ्यांची, बुद्धिमत्ता चाचणी व मुलाखतीद्वारा या शाखेसाठी निवड करण्यात आली. कर्वेनगर, गणेशनगर, नवसह्याद्री परिसरात राहाणारी व वेगवेगळया कौटूंबिक स्तरांत वाढणारी ही ३५ पाखरे रोज संध्याकाळी शाखास्थानावर जमू लागली. एकत्र खेळू लागली;

अभ्यास करू लागली. दैनंदिन शाखेवर शिकविलेल्या त्रिसूत्रीचे पालन करण्यास सुरुवात करून ही बालके वर्धिनीच्या संस्कारयात्रेत सहभागी झाली.

दि. २९ ऑगस्ट ९३ या दिवशी समारंभपूर्वक या शाखेचे उद्‌घाटन झाले. वर्धिनीच्या परिवारातील सर्व लहान-थोर आपल्या सर्व सद्‌भावनांसह नववर्धकांना शुभेच्छा देण्यासाठी या कार्यक्रमाला उपस्थित राहिले. वर्धिनीचे कार्याध्यक्ष मा. कृ. ल. पटवर्धन यांच्या भावपूर्ण मनोगताने सर्व पालकांची मने वर्धिनीमय झाली.

थोड्या काळातच शाखेच्या संस्कारांचे परिणाम मुलांमध्ये दिसू लागले. सुरुवातीला बुजणारी, बोलायला घाबरणारी मुलं, आता इतकी बोलतात की त्यांना कसं आवरावं तेच समजत नाही. सर्वांसमोर येऊन गोष्टी सांगण्याचं, बोलण्याचं धाडसही आता ती करू लागली आहेत. यंदाच्या गणेशोत्सवात या मुलांचे टिपरी पथक सहभागी झाले होते. पथकाच्या तयारीच्या निमित्ताने शिस्तही आता अंगवळणी पडली आहे. एखाद्या वेळेस युवकांना शाखेवर येण्यास उशीर झाला तरी मुलेच वेळेवर शाखा भरवून कार्यक्रम सुरू करतात.

मुलांच्या घरातही वर्धिनी पोचली आहे. त्यांच्या पालकांनाही मुलांच्या वागण्या बोलण्यात फरक जाणवू लागला आहे. अर्थात हे काम दीर्घकाळ सातत्याने करायचं आहे. त्यातूनच तरुण, तडफदार, एकसंघ युवकांचा गट उभा राहायचा आहे; तेव्हा तेथील कामाला खऱ्या अर्थाने गती आली असं म्हणता येईल.


उदात्त अशा अनेक सद्‌विचारांना कृतीत आणण्यासाठी स्थापित झालेली सुबोधानंद शाखा आपल्या सर्व अपेक्षा पूर्ण करेल अशी 'स्व'-रूपवर्धिनीला खात्री आहे.

**।। जयतु भारतः ।।**

●●●

## आता त्यांचे स्मरण तेवढे शक्य आहे!

दिवा विझल्यानंतर प्रकाश हरवल्याचं दु:ख अफाट असतं. त्याची वेदना कल्पनेच्या पलीकडे आहे. या दु:खावर उपाय एकच. आपण स्वत:च ज्योतीस्वरूपात प्रकाशणं व त्या प्रकाशाचा इतरांना आधार देणं.



*भूकंपाच्या आपत्तीत दुरावलेले आमचे हजारो बांधव*

***कै. एकनाथबापूजी कोंडेदेशमुख,***

***कै. विठ्ठल शामराव नगरकर,***

***कै. मोहन तेंडूलकर,***

***कै.शशीकांत सिकची, कै. कमलाबाई जगन्नाथ नरवणे***

***कै. किरण आपरे*** (इ. ७ वीतील वर्धक)

प्रियजनांचा हात निसटून अकस्मात पुढे गेलेले

भीषण बसअपघातातील चिमुकले साथी

**ॐ तमसो मा ज्योतिर्गमय !**

*शिक्षण आणि आरोग्याचा संगम*

# संभाजीनगर शाखावृत्त

शिक्षण आणि आरोग्य एकत्र आलं की चांगलं काम उभं राहू शकतं, असा आपला संभाजीनगर येथील कामाचा अनुभव आहे. दोन्हीही गोष्टी मूलभूत, अपरिहार्य, पण अनेक ठिकाणी त्याची कमतरताच भासते, आहे तिथे सुधारणेला भरपूर वाव. त्यामुळे आरोग्य केंद्राच्या जोडीला शाखेच्या माध्यमातून शिक्षणाचं काम पूरक होऊ शकतं. येथील काम सुरू होऊन तीन-चार वर्षं झाली. यंदा आणखी दोन नवीन ठिकाणी काम सुरू झालं, त्यामुळे जबाबदारी आणखी वाढली.

यापूर्वी 'स्व'रूपवर्धिनीच्या हिवाळी व उन्हाळी शिबिराला येथून निवडक मुले जायची. यावर्षी कार्यकर्त्यांचा विश्वास वाढल्याने सर्वांचे एकत्र शिबिर संभाजीनगरला घ्यायचे ठरले. दि. १९ ते २१ नोव्हेंबर, ९३ या काळात तिन्ही शाखांचे शिबिर सिडको परिसरातील धर्मवीर संभाजी विद्यालयात झालं. त्याचा अनुभव उत्साहवर्धक आहे. शिबिरात पुढीलप्रमाणे सत्रे झाली.

| | | |
|---|---|---|
| १) श्री. मधुकर जाधव<br>२) श्री. रमेशभाई खंडागळे (दलित पँथर) | — | शिबिर कशासाठी ? |
| ३) श्री. दि. दा. जोशी | — | कोयना भूकंप व पानशेत पुराचे अनुभव, दैनंदिनीचे महत्त्व |
| ४) श्री. नाना नवले | — | वैयक्तिक प्रगती व शाखा |
| ५) डॉ. रंजन गर्गे | — | वैज्ञानिक दृष्टीकोन |
| (अधिव्याख्याता, वैद्यकीय महाविद्यालय) | — | दैनंदिन जीवनातील विज्ञान |
| ६) श्री. कांचन देशमुख | — | विज्ञान कथा |
| ७) श्री. सुनिल कुलकर्णी, पुणे | — | विज्ञानातील गमतीजमती — प्रयोग |
| ८) श्री. मा. मा. क्षीरसागर | — | शिबिरानंतर काय? |

या शिबिरातील भोजनासाठी धर्मवीर संभाजी विद्यालयातील दहावीच्या विद्यार्थ्यांनी चांगली मदत केली. आपला अभ्यास सांभाळून घरोघरी, जाऊन, त्यांनी शिबिरातील विद्यार्थ्यांसाठी पोळ्या गोळा केल्या.

शिबिर संपताना सर्वच मुलांनी 'शोधबोध'मध्ये 'शिबिर आणखी पाच-सहा दिवस हवे होते' असे लिहिले. आणखी काही प्रतिक्रिया पुढीलप्रमाणे —

- नवीन मुलांशी ओळख होऊन आपण कसे वागले पाहिजे हे कळले.
- आयुष्यात एका तरी अपंग माणसाला मी हवी ती सर्व मदत करणार.
- सायकल चालविताना आपण जसे पॅडल मारणे, हात दाखविणे, हळूहळू गप्पा मारणे ही कामे करतो, तसेच अभ्यास, घरची कामे करण्याचा प्रयत्न यापुढे सतत करीन
- आपल्याकडे शिबिर झाले तर इतरांची जेवणाची व्यवस्था आम्ही सर्वजण मिळून करू.

## 'आजोळ'ची माया

दिवसेंदिवस छोट्या होत जाणाऱ्या आजच्या कुटुंबात आजी-आजोबांचा पाठीवरून फिरणारा मायाळू हात पारखा होत चालला आहे. त्याचबरोबर घरातल्या घरात सहजपणाने होणारे - अधिक चांगले वागायचे संस्कारही दुर्मिळ होत आहेत. दोन वेळचं भागविण्यासाठी आई आणि वडील दोघांनाही कामाच्या निमित्ताने अपरिहार्यपणे बाहेर पडावं लागतं. त्यामुळे मुलांचे एकाकीपणही वाढतं आहे. इयत्ता ५वी ते ७वी तील प्राधान्याने अशा मुलामुलींसाठी 'आजोळ' या नव्या प्रकल्पाचा परिवार 'स्व'-रूपवर्धिनीच्या वास्तूत आकार घेत आहे.

या वयोगटातील मुलामुलींना वाईट संगतीपासून, वाईट विचारांपासून रोखण्याचा हा प्रयत्न आहे. Prevention is always better than cure. याप्रमाणे उशीरा सुचलेल्या शहाणपणापेक्षा विधायक पद्धतीने मुलांच्या गृहपाठाची, अभ्यासपूरक विषयांची योग्य काळजी येथे घेतली जाते. योगासने, सूर्यनमस्कार, खेळ यांच्या जोडीला चांगल्या पुस्तकांचे वाचन, कथाकथन यांद्वारे त्यांच्या वेळेचा सदुपयोग करण्याचा प्रयत्न येथे होतो. हे सर्व दुपारी १.०० ते ५.०० या कालावधीत केले जाते. गेली पाच वर्षे हा प्रकल्प सुरू आहे व त्याला चांगला प्रतिसाद आहे.

यंदाच्यावर्षी एकूण ९५ विद्यार्थी आजोळच्या पटावर आहेत. उपस्थितीचे प्रमाण समाधानकारक आहे. हे विद्यार्थी परिसरातील शाळांमधून आपल्याकडे येतात. त्या शाळांशीसुद्धा आपला संबंध सौहार्दपूर्ण आहे व त्याचा मुलांच्या प्रगतीच्या दृष्टीने चांगला उपयोग होतो. मुलांच्या घरी येथील शिक्षकांचा वेळोवेळी संपर्क असतो. त्यातून अनेक गोष्टी लक्षात आल्या. अनेकांच्या घरी दोन वेळच्या जेवणाची भ्रांत आहे तर काही पालकांच्या व्यसनामुळे घरचे वातावरण झाकोळले आहे.

पालकांच्या उद्योग व्यवयासायाचे निरीक्षण केले असता पुढील माहिती मिळाली.

| | |
|---|---|
| **आई वडील दोघेही कामाला जातात** | १८ |
| **आई वडील आळीपाळीने कामाला जातात** | १२ |
| **वडील नोकरी करतात आई घरी काम आणते** | २० |
| **फक्त वडील नोकरी व्यवसाय करतात** | ४५ |

एकूण सत्तर टक्के मुलांच्या घरची आर्थिक स्थिती फारशी ठीक नाही. पण या स्थितीमुळे मुलांच्या प्रगतीला, शिक्षणाला अडथळा येऊ नये असा 'आजोळ'चा व 'स्व'-रूपवर्धिनीचा प्रयत्न आहे.

:::::

## मराठी शिकायला चला

आपल्या वास्तुसमोरच्या वस्तीतील महिलांच्या शिक्षणाची नेमकी गरज लक्षात घेऊन दोन वर्षांपूर्वी उर्दूभाषक महिला-मुलींसाठी मराठी शिकविण्याचा वर्ग सुरू झाला. त्याचा प्रतिसाद चांगला आहे.

शालेय मुलींचा वर्ग सौ. सुलोचना शिंदे घेतात. एकूण बावीस मुली आहेत. त्यापैकी वीस मुली साधारणपणे रोज उपस्थित असतात. त्यांना आता आकारान्त व उकारान्त शब्द येऊ लागले आहेत. वाक्य वाचू शकतात १ ते ५० अंक येतात.



बालआरोग्य व आहार, शालेय व्यवस्थापन व बालसिद्धांत असे सहा विषय शिकविले गेले. बोपोडी, चंदननगर, कोथरूड, खडकी व मंगळवार पेठ, इत्यादि ठिकाणांहून विद्यार्थिनी वर्गासाठी येत होत्या. वनस्थळीच्या संचालिका श्रीमती निर्मलाताई पुरंदरे व श्रीमती परिमल चौधरी यांच्या उपस्थितीत या वर्गाचा समारोप करण्यात आला.

:::::

## शिवणवर्ग

गेल्या वर्षभरात सहा महिने कालावधीचे दोन शिवणवर्ग झाले. प्रत्येक वर्गात साधारणपणे तीस उपस्थिती असते. सौ. शैलजा गुरव या वर्गाचे काम पाहतात. सध्या आपल्याकडे प्रशिक्षणासाठी सहा शिवणयंत्रे व एक भरतकामाचे यंत्र उपलब्ध आहे. **श्री. दामजी शिवणयंत्रांची दुरूस्ती सेवाभावाने एकही पैसा न घेता करतात. शिवणवर्गासाठी येणाऱ्या बऱ्याच मुली समोरच्या वस्तीतील आहेत. त्यातील बहुतेक पोती शिवणाऱ्या आहेत. याव्यतिरिक्त त्या आता घरशिलाई व बाहेरची शिवणाची कामेही करतात.**

याबरोबरच या मुलींना साबण व डिटर्जंट पावडर तयार करण्याचे प्रात्यक्षिक सौ. अनुराधा सहस्त्रबुद्धे यांनी दाखविले. संपूर्ण महिला विभागाची एक सहल यावर्षी लेण्याद्री, ओझर, शिवनेरी येथे गेली होती. अनेक मुली, महिला प्रथमच सहलीसाठी आल्या होत्या.

:::::

## कौटुंबिक सल्ला केंद्र


भारतीय स्त्री-शक्ती-जागरणच्या सहकार्याने कौटुंबिक सल्ला केंद्र नव्याने सुरू केले आहे. दर शनिवारी दुपारी ३.०० ते ५.०० या वेळात केंद्र चालते. ॲड. निलिमा गोखले, अमला फडके व संगीता भंडगे या केंद्राचे काम पाहतात. यामार्फत आतापर्यंत तीन प्रकरणे हाताळण्यात आली आहेत.

:::::

## गृहशुश्रूषा वर्ग

गृहशुश्रूषा वर्ग आता चांगला रूळला आहे. गेल्या वर्षभरात सहा महिन्यांचे दोन वर्ग झाले. पहिल्या वर्गाला एकूण तेवीस मुली होत्या. दुसरा वर्ग मार्चमध्ये सुरू झाला. या वर्गासाठी महिला आर्थिक विकास महामंडळाचे सहकार्य लाभले. या वर्गातील २१ प्रशिक्षणार्थींना ट्रायसेम योजनेअंतर्गत ३००/- रुपये पाठ्यवेतन व नोराल्ड योजनेअंतर्गत शहर विभागातील २५ प्रशिक्षणार्थींना २५०/- रुपये पाठ्यचेतन मिळाले. दोन्ही वर्ग अत्यंत चांगले झाले व आपल्या कामाच्या पद्धतीनुसार त्याला अनेक संस्कारक्षम कार्यक्रमांची जोड मिळाली. त्यामुळे **'शिवभावाने जीवाची सेवा'** असा आत्मीयतेचा परिसस्पर्श या प्रशिक्षणाला लाभला. येथे प्रशिक्षित झालेल्या युवती ज्या ज्या ठिकाणी कामासाठी जातात, तेथे अत्यंत आपुलकीने व जिव्हाळ्याने सेवा करतात असा अनुभव आहे.

या वर्गात प्रशिक्षण घेतलेल्या माया सकट यांचे मनोगत त्यादृष्टीने पुरेसे बोलके व प्रातिनिधिक आहे.



आमचा संपूर्ण वर्ग के. ई. एम. रूग्णालयाच्या आवारात जमा झाला. मुलींचे चार गट पाडले व प्रत्येक गटाला एका वॉर्डमध्ये पाठविण्यात आले. आमच्या बाईदेखील अत्यंत प्रसन्नतेने आम्हाला सूचना देत होत्या. तसे पाहिले तर आमच्या दोन्ही बाई सदैव प्रसन्न असतात. परंतु सौ. मराठेबाई शिस्तीबाबत अत्यंत कडक. त्याकारणाने आमच्यावर कधी कधी चिडत. पण ते तात्पुरतेच. त्या पुन्हा आपल्या मूळ स्वभावावर येत व आमची चूक सुधारण्याचा मार्ग सांगत. त्यांचे मार्गदर्शन आम्हाला आमच्या भल्यासाठीच उपयोगी पडणार होते. त्यामुळे आम्ही त्याचा राग मानत नसू. सौ. कलबागबाई देखील आम्हाला अत्यंत प्रेमाने शिकवत.

या पाच महिन्यात पुष्पाताईंनी दिलेले ज्ञान व संस्कार तर सुवर्णाक्षरात लिहून ठेवण्यासारखे आहेत. त्याचा आम्हाला भावी आयुष्यात नक्कीच उपयोग होणार आहे. या संस्कारांच्या जोरावर आम्ही कोणत्याही क्षेत्रात गेलो व कुठलेही पेचप्रसंग आले तरी आम्ही यशस्वी होऊ अशी मला पूर्ण खात्री आहे. अशा या माझ्या गुरूजनांना त्रिवार अभिवादन.

वॉर्डमध्ये प्रवेश केल्यावर वेदनांनी त्रासलेले रूग्ण पाहून माझे अंत:करण हेलावले. मला काही सुचेनासे होऊन चक्कर येऊ लागली. परंतु एका मेट्रनने मला धीर दिला. थोडा वेळ विश्रांती घेऊन वॉर्डमध्ये गेले. 'गुडमॉर्निंग सिस्टर' रूग्णांचे ते शब्द ऐकताच मनात एक आनंदाची लहर तरळून गेली.

एक अनुभव कायम लक्षात राहण्यासारखा आहे. एका वृद्ध रूग्णाचा रक्तदाब तपासायला गेले. मी त्यांना विचारले, 'काका, मला तुमचा रक्तदाब मोजायचा आहे. तुम्हाला त्रास तर नाही ना होणार?'

ते अतिशय प्रेमाने म्हणाले, 'मला काही त्रास होणार नाही. तुम्ही शिका. तुमचं भलं होईल. आता आमचं काय राहिलंय. तुम्ही शिकाल तर तुमचं भलं होईल!' त्यांचे उद्‌गार ऐकून मी थक्कच झाले. आजाराशी झगडत असतानादेखील ते आमच्या भल्याचं पाहत होते ही वृत्ती मला खूपच आवडली.

:::::

## माता-बाल आरोग्य केंद्र

**— डॉ. रंगनाथन**

के. ई. एम. रूग्णालय संशोधन विभागाने मंगळवार पेठेतील सदाआनंदनगरमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून एक महत्वाकांक्षी आरोग्य योजना सुरू केली आहे. 'स्व'-रूपवर्धिनी या अनौपचारिक शिक्षणासाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेचे महत्वाचे सहकार्य या कामासाठी मिळत आहे. हा प्रकल्प संयुक्तपणे राबविला जातो. या वस्तीमध्ये सुमारे ४४% मुस्लिम लोकसंख्या आहे.

आरोग्य आणि तरुण महिलांचा विकास असे दोन उद्देश प्रकल्प सुरू करण्यामागे आहेत. तरुण महिलांना काही व्यवसाय प्रशिक्षण देण्याचाही यात विचार आहे. त्यामुळे त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहता येईल असा विश्वास आहे.

*With Best Compliments from*

**M/S BALDOTA SAMAL & ASSOCIATES**

"Darshan" 1,B. J. Road,
Pune – 411 001.

☎ 663737/666844

सप्टेंबर १९९२ मध्ये या प्रकल्पास सुरूवात झाली. वस्तीतील आरोग्य आणि शिक्षणाचा दर्जा, आर्थिक स्थिती यांची प्राथमिक माहिती मिळविण्यासाठी सर्वेक्षण करण्यात आले. हे काम सुमारे तीन महिन्यात पूर्ण झाले व प्रत्यक्ष प्रकल्पास सुरूवात झाली.

महिला व मुलांची वैद्यकीय गरज लक्षात घेऊन 'स्व'-रूपवर्धिनीच्या वास्तूत माता-बाल आरोग्य केंद्र सुरू करण्यात आले. दर शनिवारी दुपारी २.०० ते ४.०० या वेळात हे केंद्र चालते. सर्व प्रकारची औषधे व वैद्यकीय साहित्य येथे उपलब्ध आहे. आवश्यकता भासल्यास के. ई. एम. रूग्णालयात अधिक उपचार करण्याची सोय आहे.

आतापर्यंतच्या कामाचा तपशील पुढे दिला आहे.

| | |
|---|---|
| **१. साप्ताहिक आरोग्य केंद्राचे एकूण दिवस** | **२६** |
| **२. मुलांची एकूण उपस्थिती** | **४९७** |
| **३. महिलांची एकूण उपस्थिती** | **३४९** |
| **४. एकूण उपस्थिती** | **८४६** |
| **५. सरासरी उपस्थिती** | **३३** |

आठवड्यातून केवळ दोन तासांची मर्यादा लक्षात घेता एकूण प्रतिसाद खूप उत्साहवर्धक आहे. या प्रकल्पामुळे परिसरातील गरजूंची अत्यंत चांगली सोय झाली आहे.

 OOO

## न • म्र • आ • वा • ह • न

'स्व'-रूपवर्धिनीच्या पहिल्या दिवसा-पासून आतापर्यंत सर्व प्रगतीचा प्रवाह हा हितचिंतकांकडून आलेल्या देणग्यांवरच झालेला आहे. कोणत्याही प्रकारचे सरकारी साहाय्य 'स्व'-रूपवर्धिनीने घेतलेले नाही आणि तरीही आजपर्यंत समाजाने सुमारे ५०-५५ लाख रुपयांचे धन दिले आहे. त्यातूनच १२ मुलांनी १९७९ साली सुरू झालेली 'स्व'-रूपवर्धिनी आज सुमारे ३०० मुलामुलींच्या शिक्षणाकडे लक्ष देऊ शकत आहे. समाजाच्या या औदार्यामुळेच आजपर्यंत अक्षरश: शेकडो कार्यक्रम होऊ शकले. कोठेही अडथळा आला नाही.

'स्व'रूप वर्धिनीच्या कार्यकारिणीच्या सर्वच सभासदांचा या कार्यात सक्रीय सहभाग व समर्थ मार्गदर्शन सातत्याने मिळते. म्हणूनच केवळ आतापर्यंतची प्रगती होऊ शकली. याची सर्व कार्यकर्त्यांना जाण आहे.

समाजाने अशीच मदत केली तर समोर कामाचे डोंगर उभे आहेत. त्यातील काही समर्थ हाताने उचलता यावे असे हात उत्पन्न करणे शक्य आहे व आवश्यकही आहे.

आपल्या मदतीचा हात पुढे असावा आणि आपल्यासारखेच आणखी हात तयार करावेत व ह्या कामात आपले भरीव साहाय्य मिळावे, हे नम्र आवाहन. • • •

*With Best Compliments from*

**M/S LANDMARK CONSTRUCTIONS**

"Darshan", 1, B. J. Road,
Pune – 411 001.

☎ 666844

# पुढच्या कामाची दिशा .....

– श्री. दि. दा. जोशी
प्रधान शाखा पालक

'स्व'-रूपवर्धिनीचं काम हे एक मूलभूत स्वरूपाचं काम आहे. सहवासातून शिक्षण व शिक्षणातून संस्कार घडविण्याचा येथे प्रयत्न आहे. व्यक्तिगत स्वार्थातून बाहेर पडून समाजाचा, देशाचा स्वार्थ आपला मानणारी पिढी उभी करण्याचा हा एक प्रयोग आहे. मुलांच्या माध्यमातून घरात परिवर्तन व अशा अनेक घरांच्या परिवर्तनातून परिसराचे, समाजाचे परिवर्तन करण्याचा विचार येथे आहे. मार्ग अवघड आहे, परंतु गेल्या चौदा वर्षांच्या सातत्याच्या प्रयत्नांमुळे याबाबतीत काही यश नक्की आले आहे. 'स्व'-रूपवर्धिनीचे म्हणून एक सबळ कुटुंब त्यातून आकाराला आले आहे.

**प्रायोगिक कार्यशाळा**

शाखेचं काम हा वर्धिनीचा मूळ आधार. हा आधार तर वाढलाच, परंतु त्याच्याच जोडीला काही चांगले प्रकल्पही प्रयोगस्वरूपात येथे उभे राहिले आहेत. आपुलकीच्या भावनेतून, व्यक्तिगत संपर्काच्या माध्यमातून अशा पद्धतीच्या प्रकल्पांना चांगली दिशा मिळाली आहे. प्रेरणा जागविणाऱ्या शिक्षणाचा व नियोजनातून आखीव रेखीव कामाचा एक चांगला नमुना समोर आहे. अर्थात, हे प्रायोगिक कार्यशाळेसारखे आहे. येथील अनुभव लक्षात घेऊन अन्यत्र अशा पद्धतीने चांगले काम उभे करता येऊ शकेल, असा विश्वास आहे.

**गती वाढायला हवी**

कामाचा डोंगर प्रचंड आहे, परंतु त्यामानाने कामाची गती कमी पडते आहे. तळमळीचे सहृदय शिक्षक व कार्यकर्ते उभे करणे ही अवघड बाब आहे. चांगली कर्तबगार माणसे जोडून उभे करण्याच्या प्रक्रियेत सातत्य व चिकाटी असायला हवी. त्यामुळे हे महत्त्वाचे काम करणाऱ्या व्यक्तींची संख्या व समज वाढविणे व त्यांचा एक चांगला गट उभा करणे हे काम 'स्व'-रूपवर्धिनी येत्या काही वर्षात प्राधान्याने करणार आहे.

असा गट उभा करण्यासाठी विशेष प्रयत्नांची आवश्यकता आहे. सध्या मुलांची तसेच युवकांची दर रविवारी मानसिक विकास बैठक होते. त्यात मुलांना विचारप्रवृत्त करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे विषय मांडले जातात, चांगल्या पुस्तकांचे वाचन होते, त्या संबंधाने उलट-सुलट परंतु विधायक दृष्टी कायम ठेवून चर्चा होते. याबरोबरच गटकार्यांच्या माध्यमातून जबाबदारीने काम करण्याची सवय होते, स्वत:हून काही करण्याची प्रवृत्ती वाढते. अशा चांगल्या उपक्रमांची गुणवत्ता वाढविणे व अशा पद्धतीच्या अनेक नव्या कल्पना रूजविणे या दृष्टीने प्रयत्न करण्याचा संकल्प आहे. येणारी वर्षे वैचारिक आव्हाने घेऊन येणारी आहेत. अशा सर्व आव्हानांचा सामना करण्याची शक्ती येथे जोपासली जाणार आहे. विचारांबरोबर तितकीच समर्थ कृती करण्याचे सामर्थ्य उभे करण्याचा विश्वास आहे.

**परिपूर्णतेचा ध्यास**

सामाजिक काम म्हणजे ढिलेपणाचं .....

*With Best Compliments from*

**GURUPRASAD TRANSPORT**

*All types of Transport Service*
*All Over Maharashtra*

*156 Mangalwar Peth, Parge Chowk,*
*Barne Road, Pune 411 011. Phone : 27260*

केव्हाही, कोठेही, कसंही करायचं काम असा अनेकांचा गैरसमज असतो. परंतु या कामासाठी सर्वात जास्त नियोजन, कौशल्य लागते असा अनुभव आहे. त्यादृष्टीने शास्त्रीय पद्धतीने काही गोष्टी रूजविण्याचा प्रयत्न होणे आवश्यक आहे. मुलांच्या अभ्यास व अभ्यासेतर गोष्टींतील दोष हळुवारपणे कमी करण्याचा व सुप्त गुणांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न अधिक चांगल्या पद्धतीने करणे शक्य आहे. त्याच्या पाठपुराव्याची व त्यांच्या क्षमता व आवडीला अनुसरून शिक्षणाचे, व्यवसायाचे क्षेत्र निश्चित करता येऊ शकेल अशी रचना उभी करण्याचा विचार आहे. अशा अनेक गोष्टींमध्ये परिपूर्णता साधता येईल. परंतु विकास ही गोष्ट अशी आहे की त्यात ठराविक पद्धत यशस्वी ठरेल हे अशक्य आहे. त्यामुळे विकासाला पोषक वातावरण उभे करायचे व त्या जोडीला सामाजिक बांधिलकीची जाणीव सातत्याने करून द्यायची हा प्रयत्न आहे.

**विस्ताराची दिशा**

असा प्रयत्न आज पुण्यात सात ठिकाणी सुरू आहे. संभाजीनगर (औरंगाबाद) येथेही आपल्या कार्यकर्त्यांनी असे काम उभे केले आहे. परंतु हे काम पुरेसे नाही. त्यामुळे येत्या काही वर्षात असं काम करू शकणाऱ्यांची संख्या वाढविणं हा विस्ताराचा पहिला टप्पा असणार आहे. त्या जोरावर पुण्यात आणखी दोन-तीन ठिकाणी चांगलं, प्रभावी काम नक्की उभं करता येईल. अशा कामात स्थानिक सहकार्यही मिळवावं लागेल. 'आजोळ' सारखा प्रकल्पही एक दोन ठिकाणी सुरू करता येऊ शकेल.

जेथे जेथे म्हणून उपेक्षित बुद्धिमत्ता आहे, पुढे जाण्याची धडपड आहे, अशा ठिकाणी पोचण्याचा मानस आहे. पुण्याजवळच्या काही गावात किंवा महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांच्या ठिकाणी अशी मुलं शोधून नेतृत्व उभे करण्याचा विचार आहे. विचार अशासाठी म्हटलं की, सध्या आपली शक्ती मर्यादित आहे. अशा कामांमध्ये सातत्य, चिकाटी व सर्वात महत्त्वाची म्हणजे तळमळ असणे आवश्यक आहे. त्यामुळे कामाची गुणवत्ता कमी न करता विस्तार करायला हवा.

'स्व'-रूपवर्धिनीसारख्या अशा अनेक संस्था आहेत. आपापल्या कक्षेत राहून त्या चांगले काम करतात. समाजावर त्याचा व्यापक परिणाम होण्यासाठी व त्या त्या संस्थांमधील कामाची गुणवत्ता वाढविण्यासाठी अशा संस्थांमध्ये परस्पर सहकार्य व समन्वयाची नितांत आवश्यकता आहे. या दिशेने काही प्रयत्न सध्या सुरू आहेत. त्या प्रयत्नांमध्ये काही योगदान करण्याचा 'स्व'-रूपवर्धिनीचा संकल्प आहे.

• • •

## असाही एक संकल्प

*वाढदिवसाच्या दिवशी वर्धकांच्या घरी जाऊन त्यांना शुभेच्छा देण्याची 'स्व'-रूपवर्धिनीची पद्धत आहे. या निमित्ताने वर्धकांनी एखादी छोटीशीच पण चांगली गोष्ट सातत्याने करण्याचा निश्चय करायचा असा आग्रह असतो. त्यातून मुलांमध्ये अनेक चांगले बदल घडल्याची उदाहरणे आहेत. परीक्षेतील गुण वाढले, स्पर्धांमध्ये पारितोषिक मिळविले, पालकाचे व्यसन सुटले असे अनेक चांगले अनुभव जमेस आहेत.*

*रामकृष्ण शाखेतील एका वर्धकाने मात्र या संकल्पाला वेगळेच परिमाण मिळवून दिले. तो म्हणाला, "मी माझे गुण वाढवीन, स्वत: चांगले वागीन. हे तर वर्धिनीमुळे होणारच. पण या वर्षात मी माझ्या काही मित्रांचे तंबाखूचे, पानपरागचे, सिगारेट ओढण्याचे प्रकार बंद करीन. त्यांना चांगल्या सवयी लावीन." याआधीसुद्धा या वर्धकाने त्याच्या दोन - तीन मित्रांची व्यसने बंद करण्यात यश मिळविले आहे. त्यामुळे तो हा संकल्प पूर्ण करील असा विश्वास जरूर आहे. केवळ स्वत:पुरते न पाहता - 'मी' पणातून बाहेर येऊन आपलेपणाचे क्षितीज वाढविण्याचा त्याचा हा प्रयत्न म्हणजेच 'स्व'-रूपवर्धन नव्हे का?* • • •

## दैनंदिन प्रकल्पांचे पत्ते व संपर्क

१) ***रामकृष्ण शाखा***
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११
शाखाप्रमुख – श्री. पराग जगताप
शाखापालक – श्री. सुनिल कुलकर्णी

२) ***समर्थ रामदास उपशाखा***
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११
शाखाप्रमुख – श्री. सुभाष चलवादी
शाखापालक – श्री. प्रमोद बेहरे

३) ***विवेकानंद शाखा***
भारतीय विद्याभवनचे छाब्रिया विद्यालय,
शिवाजीनगर, पुणे १६
शाखाप्रमुख – श्री. गिरीश अडके
शाखापालक – श्री. र. ज. नरवणे

४) ***चंद्रशेखर आझाद उपशाखा***
हुतात्मा राजगुरू विद्यालय,
पांडवनगर, वडारवाडी, पुणे १६
शाखाप्रमुख – श्री. किशोर भागवत
शाखापालक – श्री. र. ज. नरवणे

५) ***अखंडानंद शाखा***
कै. यशवंतराव चव्हाण विद्यालय,
बिबवेवाडी, पुणे ३७
शाखाप्रमुख – श्री. विनोद बिबवे
शाखापालक – श्री. राजाभाऊ लवळेकर

६) ***सुबोधानंद शाखा***
ज्ञानदा प्रशाला, नवसह्याद्री वसाहत,
कर्वेनगर, पुणे ५२
शाखाप्रमुख – श्री. निशिकांत वाईकर
शाखापालक – श्री. व. ना. दाते

७) ***भगिनी निवेदिता शाखा***
आगरकर मुलींचे विद्यालय,
रास्ता पेठ, पुणे ११
शाखाप्रमुख – कु. प्रांजली लकडे
शाखापालक – श्री. शिरीष पटवर्धन

८) ***'आजोळ'***
'स्व'-रूवर्धिनीची वास्तू
प्रमुख – श्री. जयंत कवठेकर
संपर्क :
सोम. ते शुक्र. सायं. १ ते ५

९) ***शारदामणि महिला विभाग व बालवाडी ('पाकोळी')***
'स्व'-रूवर्धिनीची वास्तू
प्रमुख – श्रीमती पुष्पाताई नडे
संपर्क :
सोम. ते शुक्र. स. १० ते १,
शनि. ९ ते १०.३०

१०) ***कार्यालय***
१) श्रीमती वासंतीताई यादव,
२) श्री. रामकृष्ण रानडे
संपर्क :
सोम. ते शनिवार स. ११ ते ५

**दैनंदिन शाखांसाठी संपर्क :**
सोम. ते शुक्र. सायं. ६.१५ ते रात्री ८.३०
शनिवार दु. ४.३० ते सायं. ७.३०
रविवार स. ७.३० ते १०.००

**प्रधान शाखा पालक**
**श्री. दि. दा. जोशी**
जनता गृहरचना संस्था,
बिबवेवाडी, पुणे ३७.

# कार्यकारिणी व मा. सभासदांची यादी

## सन्माननीय सभासद

श्री. जयसिंगभाई मरिवाला
श्री. नानासाहेब पवार
श्री. अविनाश वारदेकर
श्री. एम. ए. वदूदखान

*

## कार्यकारी समिति

**अध्यक्ष**
श्री. पु. व श्रॉफ

*

**उपाध्यक्ष**
श्री. अ. न. गोगावले

*

**कार्याध्यक्ष**
श्री. कृ. ल. पटवर्धन

*

**सहकार्याध्यक्ष**
श्री. व. ना. दाते

*

**सहकार्याध्यक्षा**
श्रीमती कुंतला मुजुमदार

*

**कोषाध्यक्ष**
श्री. श्री. शं. सामळ

*

**सचिव**
श्री. रा. प. देसाई

*

**सहसचिव**
श्री. शिरीष रा. पटवर्धन

*

## सभासद

श्री. प्रतापराव पवार
श्री. वा. दे. संचेती
श्री. कां. गि. शहा
श्री. कृ. गो. लवळेकर
प्रा. श्रीमती उष:प्रभा देसाई
श्री. उदय गुजर
श्री. पुखराजजी जैन
सौ. चंद्राताई दलाया

*

## संपर्क

**कार्याध्यक्ष :**
श्री. कृ. ल. पटवर्धन
४२८/२०, शिवाजीनगर,
पुणे ४११ ०१६.
दूरध्वनी : ३४५८३५

किंवा

**कार्यवाह :**
श्री. रा. प. देसाई
दूरध्वनी : ६६४३७५
किंवा
श्रीमती कुंतला मुजुमदार
दूरध्वनी : ३४३६०६

**'स्व'रूपवर्धिनी**
२२/१, मंगळवार पेठ,
सोनावणे पथ,
पुणे - ४११०११
दूरध्वनी : २१७०४

# माझे हे शब्द स्मरणात ठेवा

जर आपल्याला देशाचे हित करण्याची आपली इच्छा असेल तर आपणांपैकी प्रत्येकाला गुरू गोविंदसिंह व्हावे लागेल. आपल्या देशबांधवामध्ये तुम्हाला हजारो दोष आढळतील. पण ते हिंदू रक्ताचे आहेत हे विसरु नका. या देवांचे पूजन तुम्हाला प्रथम करावे लागेल. त्यांनी तुमच्यावर सर्व प्रकारे आघात केले, शिव्याशाप दिले, तरी तुम्हाला त्यांच्याशी प्रेमानेच बोलावे लागेल. त्यांनी जर तुम्हाला घालवून दिले, तर त्या शक्तिमान पुरुषसिंहाप्रमाणे - गुरू गोविंदसिंहाप्रमाणे विजनवास पत्करा आणि शांत चित्ताने मृत्यू स्वीकारा. गुरुंचा आदर्श आपल्यापुढे असला पाहिजे. त्यांच्याप्रमाणे वागणारा मनुष्यच 'हिंदू' म्हणवून घेण्यास योग्य आहे.

**- स्वामी विवेकानंद.**


# Statfield System Pvt.Ltd.

**A - 54 / 55 H Block MIDC Pimpri, Pune - 411018**
**A/88 Hadpsar Ind.Area, Pune**

REGD. NO. F-1694/PUNE

NAME OF THE PUBLIC TRUST - **'SWA'-ROOPWARDHINEE**

## BALANCE SHEET
as on 31-3-1993

| Funds & Liabilities | | Rs. | Property & Assets | Rs. |
|---|---|---|---|---|
| Trust Funds or Corpus | | 44,527-12 | Immovable Properties (at cost) | 25,56,477-10 |
| Building Fund | | 35,42,204-30 | | |
| Loans (Secured or unsecured) | | 13,500-00 | Investments | 3,21,000-00 |
| Liabilities | | 13,500-00 | Furniture & Fixtures | 85,054-98 |
| Audit Fees | 5,200-00 | | Loans | 2,000-00 |
| Library Deposit | 675-00 | 5,875-00 | Advances | 34,200-00 |
| | | | Income Outstanding | 9,033-85 |
| | | | Cash & Bank Balance | 4,71,505-84 |
| | | | Income & Expenditure Account | 1,26,834-65 |
| **Total Rs.** | | **36,06,106-42** | **Total Rs.** | **36,06,106-42** |

The above Balance Sheet to the best of my/our belief contains a true account of the Funds and Liabilities and of the Property and/Assets of the Trust.

माझ्या / आमच्या उत्तम माहितीप्रमाणे वरील स्थितीविवरणात दिलेल्या ट्रस्टच्या निधी आणि देयता मालमत्तेचा हिशोब खरा आहे.

**'स्व' - रूपवर्धिनी करिता**

खजिनदार कार्याध्यक्ष अध्यक्ष

ट्रस्टीची सही

दिनांक २७ ऑक्टोबर, ९३

As per our report of even date..

FOR U. B. GUJAR & CO.
CHARTERED ACCOUNTANTS

Chartered Accountants Auditors

NAME OF THE PUBLIC TRUST - **'SWA'-ROOPWARDHINEE**

## BALANCE SHEET
as on 31-3-1993

| Expenditure | Rs. | Income | Rs. |
|---|---|---|---|
| To Expendituer in respect of Properties | 1,23,977-98 | On Bank Account | 1,656-00 |
| To Establishment Expenses | 93,862-05 | By Dividend | 150-00 |
| To Audit Fees | 2,600-00 | By donations in Cash or Kind | 2,71,468-15 |
| To Misc. Expenses | 1,857-55 | By Income from other sources | 1,14,619-00 |
| To Depreciation | 20,561-53 | By Deficit carried over to Balance Sheet | 33,536-36 |
| To Expenditure on objects of the Trust | 1,78,570-40 | | |
| **Total Rs.** | **4,21,429-51** | **Total Rs.** | **4,21,429-51** |

The above Balance Sheet to the best of my/our belief contains a true account of the Funds and Liabilities and of the Property and/Assets of the Trust.

माझ्या / आमच्या उत्तम माहितीप्रमाणे वरील स्थितीविवरणात दिलेल्या ट्रस्टच्या निधी आणि देयता मालमत्तेचा हिशोब खरा आहे.

**'स्व' - रूपवर्धिनी करिता**

खजिनदार　　कार्याध्यक्ष　　अध्यक्ष

ट्रस्टीची सही

दिनांक २७ ऑक्टोबर, ९३

As per our report of even date..

FOR U. B. GUJAR & CO.
CHARTERED ACCOUNTANTS

Chartered Accountants　　Auditors